# उद्गार आणि बोधवचनें



## स्वामी विवेकानंद

रामकृष्ण आश्रम
नागपूर

श्री रामकृष्ण आश्रम,

नागपूर यांसकडून

सप्रेम भेट:—

वा. के. लेले, एम्. ए.,
घर नं. बी २७/९८ सी,
गौरीकुंड, वाराणसी-५

# उद्धार आणि बोधवचनें

स्वामी विवेकानंद

श्रीरामकृष्ण आश्रम
नागपूर

प्रकाशक :
स्वामी भास्करेश्वरानंद
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर–१.

अनुवादक :
प्रा. बा. के. लेले,
एम्. ए.,
वाराणसी

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ५५ वें

( सर्व अधिकार श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर
द्वारा सुरक्षित )

मुद्रक :
श्री. डी. पी. देशमुख
बजरंग मुद्रणालय,
कर्नलबाग, नागपूर–२.

मूल्य १ रु.

# दोन शब्द

'उद्गार आणि बोधवचनें' हें आमचें नवीन प्रकाशन वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. भारताच्या पुनरुत्थानासाठी आणि जगाच्या उद्धारासाठी स्वामी विवेकानंदांनी केलेलें महान् कार्य सर्वांना विदितच आहे. स्वामी विवेकानंद हे चैतन्याचें व ओजाचें मूर्तिमंत प्रतिक होते. त्यांचें दिव्य व्यक्तिमत्त्व त्यांनी संपादिलेल्या विभिन्न कार्यांतून आणि त्यांच्या वाणींतून प्रकट होतें. विविध प्रसंगीं त्यांनी जे महत्त्वाचे उद्गार काढले आणि जो मोलाचा उपदेश केला त्या सगळयांचें संकलन प्रस्तुत पुस्तकांत केलें आहे. त्यांच्या या उद्गारांत आणि बोधवचनांत त्यांच्या अमानवी प्रतिभेचें दर्शन घडतें. आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यादि विविध विषयांवर त्यांनी जे मौलिक विचार प्रकट केले आहेत ते जीवनाकडे पाहण्याची नवीन दृष्टि देतात. वैयक्तिक जीवनांत आणि सामूहिक कार्यांत उचित परिवर्तन घडवून आणण्यासाठी आणि जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वामी विवेकानंदांचे हे विचार खचित

उपकारक ठरतील. उच्च आध्यात्मिक अनुभूतींवर हे विचार आधारलेले असल्यामुळे ते ज्या शब्दांमधून प्रकट झाले त्यांना आगळें महत्त्व प्राप्त झालें आहे.

मूळ इंग्रजींतून या पुस्तकाचा मराठी अनुवाद करण्याचें कार्य प्रा. वा. के. लेले, एम्. ए., वाराणसी यांनी केलें आहे. या महत्त्वाच्या कार्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

१५-११-१९६४ — प्रकाशक



# उद्गार आणि बोधवचनें

१. मनुष्य प्रकृतीवर मात करण्यासाठी जन्माला आलेला आहे, प्रकृतीचा गुलाम होऊन राहण्यासाठी नव्हे.

२. जेव्हा आपण एक शरीर आहोंत असा तुम्ही स्वतःचा विचार करतां, तेव्हा तुम्ही विश्वापासून वेगळे असतां; जेव्हा आपण एक जीव आहोंत असा तुम्ही स्वतःचा विचार करतां तेव्हा तुम्ही त्या महान् शाश्वत अग्नीचा--परमात्म्याचा--एक स्फुलिंग असतां; जेव्हा तुम्ही आपण आत्मा आहोंत असा विचार करतां तेव्हा तुम्ही सर्वव्यापक परमात्माच असतां.

३. इच्छाशक्ति ही स्वाधीन नाही; ती कार्य-कारणभावाने बद्ध आहे; परंतु इच्छाशक्तीच्या मागे असें कांहीतरी आहे की जें स्वाधीन आहे.

४. सामर्थ्य हें भलेपणांत आहे, पावित्र्यांत आहे.

५. विश्व म्हणजे विषयरूपाने व्यक्त झालेला ईश्वर होय.

६. जोंवर तुमची स्वतःवर श्रद्धा नाही, तोंवर तुम्ही ईश्वरावर श्रद्धा ठेवूं शकणार नाही.

७. आपण शरीररूप आहोंत हा भ्रमच वाइटाचें मूळ आहे. मूलभूत पाप जर कोणतें असेल तर तें हेंच होय.

८. एका पक्षाचें म्हणणें असें की जडद्रव्यापासून विचार निर्माण होतो, तर दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें की विचारापासून जडद्रव्य उत्पन्न होतें. हीं दोन्ही विधानें चुकीचीं आहेत; जडद्रव्य आणि विचार हीं दोन्हीं बरोबरच अस्तित्वांत असतात. असें एक कांही-तरी तिसरें सत्य आहे की ज्यामधून जडद्रव्य आणि विचार हीं दोन्हीं निर्माण झालेलीं आहेत.

९. ज्याप्रमाणे जडद्रव्याचे कण अवकाशांत पर-स्पराशीं संयुक्त होतात त्याप्रमाणे मानसलहरी वा विचार कालतत्त्वांत एकत्र मिसळून जातात.

१०. ईश्वराची व्याख्या करणें हें पिष्टपेषण करण्यासारखें आहे; कारण ज्याचें आपल्याला ज्ञान आहे असा तोच एकमेव पुरुष होय.

११. धर्म ही अशी वस्तु आहे की जिच्यामुळे पशूचें मनुष्यांत आणि मनुष्याचें ईश्वरांत रूपान्तर होतें.

१२. बाह्य प्रकृति ही अंतःप्रकृतीचें केवळ विस्तृत रूप होय.

१३. हेतु हा तुमच्या कार्याचा मानदंड असतो. आपण ईश्वर आहोंत आणि अगदी खालच्या पातळी-वरील मनुष्यहि ईश्वर आहे ह्या जाणिवेहून उदात्ततम हेतु कोणता असूं शकेल ?

१४. ज्याला मनोविश्वाचें निरीक्षण करावयाचें असेल त्याने अत्यंत शक्तिसंपन्न असलें पाहिजे आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने त्याचें शिक्षण झालेलें असलें पाहिजे.

१५. मन म्हणजेच सर्वकांही, विचार म्हणजे

सर्वकांही असा विश्वास बाळगणें हा केवळ उच्च स्वरूपाचा जडवाद होय.

१६. हें जग म्हणजे एक विशाल व्यायामशाळा असून येथे आपण स्वतःचें सामर्थ्य वाढविण्यासाठी येत असतों.

१७. ज्याप्रमाणे तुम्ही एखादें रोपटें वाढवूं शकत नाही त्याप्रमाणे तुम्ही एखाद्या लहान मुलाला शिकवूं शकत नाही. तुम्ही फक्त अकरणात्मक स्वरूपाचें ( negative ) काम करूं शकतां—तुम्ही फक्त मदत करूं शकतां. ज्ञान हें आंतूनच प्रकट होत असतें. लहान मूल आपल्या स्वभावानुसार स्वतःचा विकास करून घेत असतें. तुम्ही फक्त विकासाच्या मार्गांतील अडथळे दूर करूं शकतां.

१८. ज्या क्षणीं तुम्ही एखादा संप्रदाय स्थापन करतां त्या क्षणीं तुम्ही विश्वबंधुत्वाला विरोध करतां. ज्यांना खरोखर विश्वबंधुत्वाची अनुभूति होते ते फारसे बोलत नाहीत, परंतु त्यांच्या कृतिच अधिक

बोलक्या असतात.

१९. सत्याचें प्रतिपादन हजारो निरनिराळ्या प्रकारांनी करतां येतें, आणि तरीहि त्यांपैकी प्रत्येक प्रकार सत्य असूं शकतो.

२०. तुमचा विकास आंतून झाला पाहिजे. तुम्हांला कोणीहि शिकवूं शकत नाही, तुम्हांला कोणीहि आध्यात्मिक बनवूं शकत नाही. तुमच्या स्वतःच्या आत्म्याव्यतिरिक्त तुमचा दुसरा कोणताहि शिक्षक नाही.

२१. एखाद्या अनंत साखळीच्या कांही दुव्यांचें स्पष्टीकरण करतां आलें, तर त्याच रीतीनें सर्व दुव्यांचें स्पष्टीकरण करतां येतें.

२२. जो मनुष्य कोणत्याहि भौतिक कारणामुळे विचलित होत नाही त्यानेच अमरत्व प्राप्त करून घेतलें असें म्हणावें लागेल.

२३. सत्यासाठी सर्व गोष्टींचा त्याग होऊं शकेल, परंतु सत्याचा मात्र कोणत्याहि गोष्टीसाठी त्याग होऊं

शकत नाही.

२४. सत्याचा शोध हा सामर्थ्याचा आविष्कार आहे——तें कांही दुबळ्या, आंधळ्या मनुष्याचें चाचपडणें नव्हे.

२५. ईश्वर मनुष्य बनला आहे; मनुष्य पुनः ईश्वर बनेल.

२६. मनुष्य मरतो आणि स्वर्गात जातो ही पोरांची भाषा होय. आपण कधी येतहि नाहीं अगर जातहि नाहीं. आपण जेथे आहोंत तेथेच असतों. होऊन गेलेले, विद्यमान असलेले व भविष्यकाळीं येणारे सर्व आत्मे भूमितिदृष्टया एकाच बिंदूवर असतात.

२७. ज्याचा हृद्‌ग्रंथ उघडलेला आहे त्याला इतर कोणत्याहि ग्रंथाची आवश्यकता नाही. इतर ग्रंथ आपल्याठायीं ज्ञानाची इच्छा निर्माण करतात हेंच त्यांचें मोल आहे. हे ग्रंथ म्हणजे केवळ दुसऱ्यांचे अनुभव असतात.

२८. सर्व प्राण्यांविषयी औदार्याचें वर्तन ठेवा.

दुःखितांविषयी अनुकंपा बाळगा. सर्व प्राण्यांवर प्रेम करा. कोणाचाहि मत्सर करूं नका. दुसऱ्यांच्या दोषांकडे लक्ष देऊं नका.

२९. मनुष्य कधीहि मरत नाही किंवा तो कधीहि जन्माला येत नाही. शरीर मरतें, परंतु तो कधीहि मरत नाही.

३०. कोणीहि एखाद्या धर्मात जन्माला येत नसतो, परंतु प्रत्येकजण एखाद्या धर्मासाठी जन्माला येत असतो.

३१. सबंध विश्वांत खऱ्या अर्थाने फक्त एकच आत्मा आहे, बाकी सगळे त्याचे आविष्कार होत.

३२. सर्वसामान्य जनता आणि शूर असलेले अगदी थोडे लोक अशा दोन गटांत सर्व उपासकांची विभागणी होत असते.

३३. ह्या जगांत आणि ह्या जन्मांत जर पूर्णत्व प्राप्त करणें अशक्य असेल, तर दुसऱ्या एखाद्या जन्मांत आपण पूर्णत्व प्राप्त करूं शकूं ह्या म्हणण्याला

कांही आधार नाही.

३४. मला मातीच्या एका ढेकळाचें जर पूर्णपणें ज्ञान झालेलें असेल, तर मला यच्चयावत् मातीचें ज्ञान झालें आहे असें समजावें. हें तत्त्वांचें ज्ञान झालें, परंतु तीं व्यवहारांत आणण्याच्या पद्धति वेगवेगळ्या असतात. जेव्हा तुम्हांला स्वतःचें ज्ञान होतें तेव्हा तुम्हांला सगळ्यांचें ज्ञान होतें.

३५. वेदांचा जेवढा भाग बुद्धीशीं जुळता आहे तेवढाच व्यक्तिशः मी ग्राह्य मानतों. वेदांचे कांही भाग वरकरणीं परस्परविरोधी वाटतात. वेद हे पाश्चिमात्य अर्थानें दिव्य स्फूर्तींतून निर्माण झालेले (inspired) मानले जात नाहीत, परंतु सर्वज्ञ ईश्वराच्या ज्ञानाची गोळाबेरीज असा त्यांचा अर्थ केला जातो. हें ज्ञान कल्पाच्या प्रारंभीं स्वतः प्रकट होतें; आणि कल्पाच्या अंतीं तें सूक्ष्मतम आकार धारण करून राहतें. जेव्हा कल्पाचा पुनः प्रारंभ होतो तेव्हा तें ज्ञान पुनः बाहेर प्रकट होतें. येथवर हा सिद्धान्त

ठीक आहे. परंतु वेद हें नांव ज्या ग्रंथांना दिलेलें आहे, केवळ त्या ग्रंथांतच ईश्वराचें ज्ञान समाविष्ट आहे असें म्हणणें हा निव्वळ वितंडवाद होय. मनु एके ठिकाणीं म्हणतात की, वेदांचा जो भाग बुद्धीशीं सुसंगत आहे तोच भाग वेद होय, बाकीचा नव्हे. आपल्या बऱ्याच तत्त्वज्ञांनी हीच भूमिका स्वीकारलेली आहे.

३६. जगांतील सर्व धर्मग्रंथांपैकी फक्त वेदच असे ग्रंथ आहेत की ज्यांत "वेदांचा अभ्यासहि दुय्यम होय" असें स्पष्टपणें म्हटलें आहे. "ज्या अभ्यासाच्या योगाने आपल्याला त्या 'अक्षर' पुरुषाचा साक्षात्कार होतो" तो खरा अभ्यास होय. आणि तो अभ्यास म्हणजे वाचन नव्हे किंवा विश्वास ठेवणें नव्हे किंवा तर्क करणें नव्हे, तर तो अभ्यास म्हणजे अतींद्रिय अनुभूति वा समाधि होय.

३७. पूर्वी एकदा आपण खालच्या दर्जाचे प्राणी होतों. आपल्याला असें वाटतें की ते प्राणी आपल्याहून

कांही वेगळे आहेत. " जग आपल्यासाठी निर्माण केलें गेलें आहे" असें पाश्चात्त्यांनी म्हटलेलें मीं ऐकलें आहे. वाघांना जर ग्रंथलेखन करतां आलें असतें तर त्यांनी, मनुष्य हा आमच्यासाठीच निर्मिला गेला, तो अत्यंत पापी प्राणी आहे, कारण तो आम्हांला सहजासहजी पकडूं देत नाही असें लिहून ठेवलें असतें. आज तुमच्या पायाखाली सरपटणारा किडा हा उद्याचा ईश्वर आहे.

३८. स्वामी विवेकानंद एकदा न्यू यॉर्कमधे म्हणाले, "आमच्या देशांतील स्त्रियांना तुमची ती बौद्धिक उंची प्राप्त झाली तर तें मला अतिशय आवडेल, परंतु ही गोष्ट पावित्र्याचा बळी घेऊन होणार असेल तर तें मला नको आहे. तुमच्या सर्व ज्ञानाबद्दल मला तुमचें कौतुक वाटतें. परंतु, जें वाईट आहे त्यावर गुलाबांचें पांघरूण घालून त्याला लपविण्याचा आणि त्यालाच चांगलें म्हणण्याचा तुम्ही जो प्रयत्न करतां तो मला आवडत नाही. बौद्धिक विकास हीच कांही

सर्वांत जास्त श्रेयस्कर अशी गोष्ट नव्हे. आम्ही नैतिक आणि आध्यात्मिक विकासासाठीच प्रयत्न करीत असतों. आमच्याकडील स्त्रिया फारशा सुविद्य नाहीत हें खरें. परंतु त्या अधिक शुद्ध आहेत. प्रत्येक स्त्रीने आपल्या पतीखेरीज इतर सर्व पुरुष पुत्रवत् मानले पाहिजेत.

"प्रत्येक पुरुषाने आपल्या पत्नीखेरीज इतर सर्व स्त्रिया मातृवत् मानल्या पाहिजेत. मी जेव्हा आवती-भोवती पाहतों, आणि तुम्ही ज्याला 'स्त्रीदाक्षिण्य' म्हणतां त्याचें जेव्हा मी अवलोकन करतों, तेव्हा माझ्या मनांत उबग निर्माण होतो. जोंपर्यंत तुम्ही स्त्रीपुरुषभेदाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करायचें शिकत नाही, जोंपर्यंत तुम्ही स्त्रीपुरुषांकडे मानवतेच्या समान दृष्टिकोनांतून पाहत नाही, तोंपर्यंत तुमच्या स्त्रियांची खरीखुरी प्रगति होणार नाही. तोंपर्यंत स्त्रिया म्हणजे केवळ खेळणीं होत, त्यांहून त्यांना अधिक महत्त्व नाही. या सगळ्या गोष्टी घटस्फोटाचें कारण होत.

तुमच्याकडील पुरुष समोर स्त्री दिसतांच नम्रतेने खाली वाकतील, बसण्यासाठी आसन पुढे करतील, परंतु लगेच पुढच्या क्षणीं ते तिचीं स्तुतिस्तोत्रें गाऊं लागतील. ते म्हणतील, "बाईसाहेब, आपले नेत्र किती सुंदर आहेत!" असें वागण्याचा त्यांना काय अधिकार आहे? असें वागायला पुरुष धजतोच कसा आणि तुम्ही स्त्रिया हें सारें कसें चालूं देतां? असल्या गोष्टींमुळे मानवाच्या हीन भावनांची वाढ होते. असल्या गोष्टींची उदात्त आदर्शाकडे प्रवृत्तिच नसते.

"आपण पुरुष आहोंत, आपण स्त्रिया आहोंत असा आपण विचार करतां कामा नये, तर परस्परांना प्रेमाने साह्य करण्यासाठी जन्माला आलेले आपण मानव आहोंत अशीच कल्पना आपण मनांत बाळगली पाहिजे. एखादा तरुण पुरुष आणि एखादी तरुण स्त्री हीं दोघें एकत्र आलीं की तरुण तरुणीचे गोडवे गाऊं लागतो, आणि एखाद्या स्त्रीच्या गळ्यांत पत्नी ह्या नात्याने माळ घालण्यापूर्वी दोनशें स्त्रियांचें त्याने

आराधन केलेलें असतें. छि: ! मी जर लग्न करणाऱ्यां-पैकी असतों तर हें सारें न करतांहि प्रेम करण्यासाठी एखादी स्त्री मला सहज मिळाली असती !

"मी जेव्हा भारतांत होतों आणि जेव्हा ह्या सगळ्या गोष्टी मीं बाहेरूनच अवलोकिल्या तेव्हा मला असें सांगण्यांत आलें की, हें सगळें ठीक आहे, ही सगळी निव्वळ गंमत आहे; आणि त्यावर माझा विश्वास बसला. परंतु, त्यानंतर मीं खूप प्रवास केला आणि आता मला कळून आलें की तें सगळें बरोबर नाही. तें चूक आहे; तुम्ही पाश्चात्त्य लोक डोळेझाक करतां व तें बरोबर आहे असें म्हणतां, इतकेंच. पाश्चात्त्य जातींचें वैगुण्य हें आहे की त्या तरुण, मूर्ख, चंचल आणि श्रीमंत आहेत. ह्यांपैकी एक गुण जरी अंगीं असला तरीहि अनर्थ ओढवण्याची शक्यता असते; तर मग सगळे चारीच्या चारी गुण एकवटल्यास काय अनर्थ होईल तें सांगावयास नकोच !"

स्वामीजींनी तशी सर्वत्रच कडक भाषा वापरली,

परंतु बोस्टनवर स्वामीजींनी विशेप कठोर प्रहार केले:—

"सर्व शहरांत बोस्टन अत्यंत वाईट आहे. तेथील सगळ्या स्त्रिया छांदिष्ट आहेत, चंचल आहेत. जें कांही नवीन असेल, जें कांही चमत्कारिक असेल त्याच्या मागेच त्या नेहमी धावतात."

३९. स्वामीजी अमेरिकेंत म्हणाले, "ज्या देशाला आपल्या सुधारणेचा इतका गर्व वाटतो त्या देशांत अपेक्षित आध्यात्मिकता कोठे आढळून येते ?"

४०. 'इहलोक' आणि 'परलोक' हे शब्द लहान मुलांना घाबरविण्यासाठी आहेत. जें कांही आहे तें इथेच आहे. याच जगांत आणि याच देहांत आपल्याला जर ईश्वरांत वास करावयाचा असेल तर सगळा स्वार्थ टाकून दिला पाहिजे, सगळ्या खुळचट समजुतींची हकालपट्टी केली पाहिजे. अशा व्यक्ति भारतांत राहतात. अशीं माणसें ह्या देशांत (अमेरिकेंत) कोठे आहेत ? तुमचे धर्मोपदेशक नेहमी स्वप्नाळू लोकांच्या

विरुद्ध बोलतात. ह्या देशांत स्वप्नाळू माणसांची संख्या अधिक असती तर या देशांतील लोकांचें अधिक भलें झालें असतें. स्वप्नाळूपणा आणि एकोणिसाव्या शत-काची फुशारकी ह्या दोहोंमधे बराच फरक आहे. सबंध जग ईश्वराने ओतप्रोत आहे, पापाने नव्हे. आपण परस्परांना साह्य करूं या, परस्परांवर प्रेम करूं या.

४१. माझे गुरुदेव ज्याप्रमाणे पैसा, स्त्री आणि कीर्ति ह्यांपैकी कशाकडेहि मुळीच लक्ष न देतां एखाद्या खऱ्याखुऱ्या संन्याशाप्रमाणे दिवंगत झाले त्याप्रमाणेच मीं देखील खऱ्या संन्याशाप्रमाणे दिवंगत व्हावें अशी माझी इच्छा आहे! ह्या सर्व अभिलाषां-पैकी कीर्तीची अभिलाषा ही सर्वांत हीन होय!

४२. मी सुडाची भाषा कधीहि बोललेलों नाहीं, मी नेहमी शक्तीची भाषा बोलत आलों आहें. सागर-लहरीच्या तुषारबिंदूवर सूड उगविण्याचें स्वप्न कधी आपण बाळगतों काय? परंतु एखाद्या डासाच्या दृष्टीने ही एक मोठी गोष्ट असते!

४३. एका प्रसंगीं अमेरिकेंत स्वामीजी म्हणाले, "हा देश महान् आहे हें खरें, परंतु येथे राहणें मला रुचणार नाही. अमेरिकन लोक संपत्तीचा फारच जास्त विचार करतात. इतर सर्व गोष्टींहून पैसा त्यांना श्रेष्ठ वाटतो. तुम्हां मंडळींना अजून बरेंच शिकावयाचें आहे. जेव्हा तुमचें राष्ट्र आमच्या राष्ट्रा-इतकें प्राचीन होईल तेव्हा तुम्ही अधिक शहाणे व्हाल."

४४. शरीराबाहेर निघून एखाद्या जीर्ण वस्त्रा-प्रमाणे त्याचा त्याग करणें मला कदाचित् चांगलें वाटेल, परंतु, तसें झालें तरी मी कार्य करायचा थांबणार नाहीं! जोंपर्यंत जगाला, आपण ईश्वराशीं एकरूप आहोंत असें ज्ञान होणार नाही तोंपर्यंत मी सर्वत्र लोकांना स्फूर्ति देत राहीन.

४५. मी जो कांही आहें तो माझे गुरुदेव श्रीराम-कृष्ण यांच्यामुळेच झालों आहे आणि भावी काळांत एखाद्या दिवशीं सबंध जग जें कांही होणार आहे,

तेंहि श्रीरामकृष्णांमुळेच होणार आहे. सगळ्या वस्तूंच्या मुळाशीं जें ऐक्य आहे त्याचें ते मूर्तिमंत रूप होते; त्यांनी तें ऐक्य अनुभविलें होतें आणि शिकविलेंहि होतें. त्यांना तें ऐक्य हिंदुधर्म, ईस्लाम धर्म आणि ख्रिस्ती धर्म ह्या तिन्ही धर्मांत आढळलें होतें.

४६. रसनेंद्रियाला अमळ सैल सोडा की बाकीचीं इंद्रियेंहि सैरावैरा धावत सुटलींत म्हणून समजा.

४७. ज्ञान, भक्ति, योग आणि कर्म हे मुक्तीप्रत नेणारे चार मार्ग होत. प्रत्येकाने आपापल्या स्वभावानुसार योग्य तो मार्ग चोखाळावा; परंतु चालू युगांत कर्मयोगावर विशेष भर दिला पाहिजे.

४८. धर्म ही कल्पनेची बाब नसून प्रत्यक्षानुभूतीची बाब आहे. एखादें भूत जरी एखाद्या व्यक्तीने प्रत्यक्ष पाहिलेलें असेल तरी ती व्यक्ति ज्यांनी पुष्कळ ग्रंथ वाचले आहेत अशा अनेक पंडितांपेक्षाहि श्रेष्ठ असते.

४९. एकदा स्वामीजी एका व्यक्तीची खूप

वाखाणणी करीत होते. त्या वेळीं जवळ बसलेल्यांपैकी एकजण स्वामीजींना म्हणाला, "परंतु त्याची तुमच्यावर श्रद्धा नाही." हें ऐकतांच स्वामीजी तात्काळ उत्तरले, "त्याने माझ्यावर श्रद्धा ठेवलीच पाहिजे असा कायदा का आहे? तो उत्तम कार्य करीत आहे आणि म्हणून तो स्तुतीस सर्वथा पात्र आहे."

५०. खऱ्याखुऱ्या धर्माच्या राज्यांत पुस्तकी पांडित्याला प्रवेश करण्याचा कांहीहि अधिकार नाही.

५१. ज्या दिवशीं एखाद्या धर्मपंथांत श्रीमंतांच्या पूजेचा शिरकाव होतो, त्या दिवशींच त्या धर्मपंथाच्या पतनास प्रारंभ होतो.

५२. जर तुम्हांला कांही वाईट कृत्य करावयाचें असेल तर ते तुमच्या वरिष्ठांच्या डोळ्यादेखत करा.

५३. गुरुकृपेनें, पुस्तकांचें वाचन न करतांहि एखादा शिष्य पंडित बनतो.

५४. जगांत पापहि नाही आणि पुण्यहि नाही; जगांत केवळ अज्ञान आहे. अद्वैताच्या अनुभवाने ह्या

अज्ञानाचा निरास होतो.

५५. जेव्हा धार्मिक चळवळी होतात तेव्हा अनेक चळवळी एकाच वेळीं होत असतात. त्यांच्यापैकी प्रत्येक चळवळ इतर सर्व चळवळींना मागे टाकून स्वत: पुढे जाण्याची धडपड करते. परंतु, सामान्यपणें त्यांच्यापैकी एकच खरोखर सामर्थ्यसंपन्न बनते आणि ती सरतेशेवटीं सर्व समकालीन चळवळींना गिळंकृत करते.

५६. स्वामीजी रामनद येथे असतांना बोलण्याच्या ओघांत एकदा असें म्हणाले की, श्रीरामचंद्र हे परमात्मा आहेत, सीता ही जीवात्मा आहे आणि प्रत्येक पुरुषाचें वा स्त्रीचें शरीर म्हणजे लंका आहे. शरीरांत कोंडलेल्या वा लंका बेटांत पकडून ठेवलेल्या जीवात्म्याला परमात्म्याशीं वा श्रीरामाशीं संयुक्त होण्याची नेहमी इच्छा असते. परंतु राक्षस ह्या इच्छेच्या आड येतात आणि राक्षस हे विशिष्ट गुणांचे प्रतिनिधि होत. उदाहरणार्थ, बिभीषण हा सत्त्वगुणाचा, रावण

हा रजोगुणाचा आणि कुंभकर्ण हा तमोगुणाचा प्रतीक आहे. सत्त्वगुण म्हणजे चांगुलपणा; रजोगुण म्हणजे कामवासना व इतर हीन विकार आणि तमोगुण म्हणजे अज्ञान, आळस, लोभ, मत्सर व त्याचे सहचारी गुणधर्म. हे गुण शरीरांतील अर्थात् लंकेंतील सीतेची अर्थात् जीवात्म्याची परमात्म्याशीं वा रामाशीं भेट होऊं देत नाहीत. अशा प्रकारें बद्ध असलेल्या व ईश्वराशीं एकरूप होण्याच्या प्रयत्नांत असलेल्या सीतेच्या भेटीला हनुमान ऊर्फ गुरु येतो व तो तिला श्रीरामाची अंगठी म्हणजेच सर्व भ्रमांचा उच्छेद करणारें सर्वश्रेष्ठ ज्ञान जें ब्रह्मज्ञान तें देतो. आणि अशा प्रकारें श्रीरामाशीं एकरूप होण्याचा मार्ग सीतेला सापडतो, किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे जीवात्मा परमात्म्याशीं एकरूप होतो.

५७. कोणताहि खरा ख्रिस्ती हा खरा हिंदु असतो आणि कोणताहि खरा हिंदु हा खरा ख्रिस्ती असतो.

५८. सर्व निकोप सामाजिक फेरफार म्हणजे

मनुष्याच्या अंत:करणांत कार्यप्रवण असलेल्या आध्यात्मिक शक्तींचे आविष्कार होत. ह्या आध्यात्मिक शक्ति जर बलसंपन्न व संतुलित असतील तर समाज त्या परिवर्तनांशीं स्वत:ला योग्य प्रकारें जुळवून घेईल. प्रत्येक व्यक्तीला स्वत:चा उद्धार स्वत:च साधून घ्यावा लागेल. त्यासाठी दुसरा उपाय नाही, आणि हाच न्याय देशांनाहि लागू आहे. तसेंच, कोणत्याहि देशांत रूढ झालेले महान् सामाजिक नियम हे त्या देशाच्या अस्तित्वासाठी अनिवार्यपणें आवश्यक असतात आणि दुसऱ्या एखाद्या देशाच्या साच्यांत घालून ह्या नियमांत बदल घडवून आणतां येत नाही. जोंपर्यंत अधिक उच्च सामाजिक नियम निर्माण होत नाहीत तोंपर्यंत जुने नियम उध्वस्त करण्याचा प्रयत्न केल्यास तो घातक ठरेल. विकास हा नेहमी हळूहळूच होत असतो.

सगळेच सामाजिक नियम थोड्याफार प्रमाणात अपूर्ण असल्यामुळे त्यांच्या उणिवा दाखविणें अगदी

सोपें असतें. परंतु, कोणत्याहि नियमांच्या प्रभावाखाली राहणाऱ्या एखाद्या व्यक्तीला अपूर्णतेवर मात करण्याच्या बाबतींत जो मनुष्य मदत करतो तोच मानवजातीचा खराखुरा उपकारकर्ता होय. व्यक्तींचा विकास झाला की देशाचा आणि तेथील सामाजिक नियमांचा विकास झालाच पाहिजे. सदगुणी माणसें दुष्ट चालीरीती आणि वाईट नियम ह्यांकडे दुर्लक्ष करतात आणि अलिखित परंतु अधिक प्रभावी अशा प्रेमाच्या, सहानुभूतीच्या आणि ऐक्याच्या नियमांचें अनुसरण करतात. जो देश नियम सांगणाऱ्या मोजक्या ग्रंथांनी आपलें कार्य भागवूं शकतो आणि ज्या देशाला कोणत्याहि विशिष्ट सामाजिक नियमांसाठी डोकेंफोड करून घेण्याची गरज भासत नाही तो देश खरोखर सुखी असतो. सच्चरित्र माणसें सर्व नियमांच्या पलीकडे जातात आणि कोणत्याहि परिस्थितींत राहणाऱ्या आपल्या बांधवांना स्वतःचा विकास करून घेण्यास साहाय्य करतात.

म्हणूनच भारतांतील प्रत्येक व्यक्तीचें सामर्थ्य किती आहे आणि तिला स्वतःच्या दिव्य स्वरूपाची कितीशी प्रतीति आलेली आहे ह्यावर भारताचा उद्धार अवलंबून आहे.

५९. जोंवर भौतिकता पूर्णपणें लुप्त होत नाही तोंवर आध्यात्मिकता कधीच प्राप्त करून घेतां यणार नाही.

६०. गीतेंतील पहिल्या अध्यायाला एक रूपक मानतां येईल.

६१. एका उतावळ्या अमेरिकन भक्ताने, जहाज चुकेल ह्या धास्तीने स्वामीजींना म्हटलें, "स्वामी, तुम्हांला वेळेचें भान नाही." त्यावर स्वामीजी शांतपणें उत्तरले, "भान नाही खरें. तुम्ही लोक कालाच्या अधीन आहांत, आम्ही कालातीत आहोंत!"

६२. आपण सदा मनोविकारांना कर्तव्याचें स्थान बळकावूं देतों आणि वर अशी प्रौढी मिरवितों की

आम्ही खऱ्या प्रेमाच्या आदेशानुसार वागतों.

६३. त्याग करण्याची शक्ति अंगीं बाणावी अशी इच्छा असेल तर आपण भावनाविवशतेच्या पलीकडे गेलें पाहिजे. भावना हा प्राण्यांचा गुणधर्म आहे. ते पूर्णपणें भावनांच्या अधीन असतात.

६४. आपल्या पोटच्या अपत्यासाठी प्राण देणें हा कांही उच्च कोटीचा त्याग नव्हे. असला त्याग पशु करतात आणि तोहि एखादी मानवी माता जितक्या सहजपणें करील तितक्याच सहजपणें करतात. तसला त्याग करणें हें कांही खऱ्या प्रेमाचें चिन्ह नव्हे; ती म्हणजे निव्वळ आंधळी भावना-विवशता होय.

६५. आपलें दौर्बल्य हें सामर्थ्य कसें भासेल, आपली भावनाविवशता ही प्रेमरूप कशी भासेल, आपला भेकडपणा हा धैर्यासारखा कसा भासेल इत्यादि इत्यादि खटपटींतच आपण नेहमी निमग्न असतों.

६६. तुमच्या अहंकार दौर्बल्यादींबाबत तुमच्या आत्म्याला असें बजावून सांगा की, "हें सारें तुला शोभत नाही. हें सारें तुला शोभत नाही."

६७. कोणत्याहि पतीने आपल्या पत्नीवर पत्नीखातर प्रेम केलें नाही किंवा कोणत्याहि पत्नीने आपल्या पतीवर पतीखातर प्रेम केलें नाही. पति प्रेम करतो तो पत्नींतील ईश्वरावर. आणि पत्नी प्रेम करते तीहि पतींतील ईश्वरावर. जी एखादी वस्तु आपल्याला आकृष्ट करते, ज्या एखाद्या वस्तूवर आपण प्रेम करूं लागतों तें तिच्यांतील ईश्वरामुळे. प्रत्येक पदार्थांत आणि प्रत्येक व्यक्तींत असलेला ईश्वर आपल्याला प्रेम करायला लावतो. ईश्वर हाच एकमेव प्रेमस्वरूप होय.

६८. आहा! जर तुम्हांला फक्त स्वत:चें स्वरूप कळलें असतें तर किती चांगलें झालें असतें! तुम्ही आत्मा आहांत; तुम्ही ईश्वर आहांत. मी जेव्हा कधी तुम्हांला मनुष्य म्हणून संबोधतों तेव्हा मी ईश्वरनिंदा

करीत आहें असें मला वाटतें.

६९. प्रत्येकाच्या ठायीं ईश्वर, आत्मा आहेच; बाकी सारें म्हणजे निव्वळ भ्रम होय, निव्वळ स्वप्न होय.

७०. जर मला आध्यात्मिक जीवनांत आनंद गवसला नाही, तर मीं इंद्रियभोगांत समाधान मानावें काय? जर मला अमृत मिळूं शकलें नाही तर मीं डबक्यांतील पाणी प्यावें काय? चातक नामक पक्षी फक्त मेघांचेंच जल पितो. तो प्रत्येक भरारीच्या वेळीं 'शुद्ध पाणी! शुद्ध पाणी!' असें मेघांना उद्देशून म्हणतो. मोठमोठी वादळें किंवा झंझावातहि त्याला खालीं उतरून जमिनीवरचें पाणी प्यायला लावूं शकत नाहीत.

७१. जो धर्मपंथ ईश्वरसाक्षात्कार करून घेण्यास तुम्हांला साहाय्य करतो तो चांगलाच आहे. धर्म म्हणजे ईश्वरसाक्षात्कार होय.

७२. नास्तिक मनुष्य उदार असूं शकतो, पण

धार्मिक असूं शकत नाही. परंतु धार्मिक मनुष्य मात्र उदार असलाच पाहिजे.

७३. प्रत्येकाची जीवननौका गुरुबाजीच्या खडकावर आदळून फुटते. परंतु जे महात्मे गुरु होण्यासाठी जन्माला आलेले असतात त्यांची गोष्ट वेगळी.

७४. माणूस हा पशुत्व, मनुष्यत्व व देवत्व ह्यांचें मिश्रण आहे.

७५. 'गरम बर्फ' किंवा 'काळा प्रकाश' ह्या संज्ञांना जितका अर्थ आहे तितकाच 'सामाजिक प्रगति' ह्या शब्दांना आहे. अंतिम दृष्टीने पाहिल्यास 'सामाजिक प्रगति' अशी वस्तुच नाही !

७६. परिस्थिति सुधारत नाही, तर तींत बदल घडवून आणल्याने आपण सुधारतों.

७७. मला माझ्या बांधवांना साहाय्य करूं द्या; एवढीच माझी इच्छा आहे.

७८. स्वामीजींना न्यू यॉर्कमध्ये एकदा एक प्रश्न विचारला गेल असतां ते हलक्या आवाजांत

म्हणाले, "नाही, माझा गूढावर विश्वास नाही. जर एखादी गोष्ट वास्तव राज्यांतील नसेल तर तिला अस्तित्व नसतेंच. विलक्षण वाटणाऱ्या गोष्टी ह्या नैसर्गिक घटना होत. ह्या गोष्टी विज्ञानाच्या क्षेत्रांतील विषय होत हें मी जाणतों. म्हणून त्या मला गूढ वाटत नाहीत. माझा गुप्त मंडळांवर विश्वास नाही. असलीं मंडळें कांहीहि भलें करीत नाहीत आणि कधीहि भलें करूं शकणार नाहीत."

७९. जगांतील माणसांची सर्वसामान्यपणें चार गटांत विभागणी होते, ते म्हणजे--बुद्धिवादी, भावनाशील, साक्षात्कारवादी आणि कर्मशील. ह्यांपैकी प्रत्येक गटांतील माणसांसाठी अनुरूप अशा उपासना-पद्धतीची आपण सोय करून दिली पाहिजे. एखादा बुद्धिवादी मनुष्य येतो आणि म्हणतो, "मला ह्या उपासनापद्धतीची किंमत नाही. मला एखादी तत्त्व-ज्ञानात्मक, बुद्धिनिष्ठ उपासनापद्धति सांगा. जिचें महत्त्व मी ओळखूं शकेन ती मला आवडेल." म्हणून

बुद्धिवादी मनुष्यासाठी बुद्धिनिष्ठ तत्त्वज्ञानात्मक उपासनापद्धति योग्य आहे.

मग येतो एखादा कर्मशील माणूस. तो म्हणतो, "तत्त्वज्ञाच्या उपासनापद्धतीशीं मला सुतराम् कर्तव्य नाही. माझ्या बांधवांसाठी करण्याजोगें काम मला द्या." तेव्हा त्याच्यासाठी कर्मरूप उपासनापद्धति युक्त ठरते. साक्षात्कारवादी आणि भावनाशील व्यक्तींसाठी त्यांना अनुरूप अशा उपासनापद्धति आहेतच. अशा प्रकारें ह्या सगळ्या लोकांना धर्मामधे त्यांच्या त्यांच्या श्रद्धेचीं स्थानें आढळतात.

८०. मी सत्याचाच पक्ष घेईन. सत्य हें असत्याशीं कधीहि सलोखा करणार नाही. उद्या सगळें जग जरी माझ्याविरुद्ध उभें ठाकलें तरी शेवटीं सत्याचाच जय होईल.

८१. मानवतेच्या अत्यंत उदात्त अशा कल्पना सर्वसामान्य जनतेच्या हातीं पडल्या की त्यांचा पहिला परिणाम म्हणजे अधोगति होय हें तुम्हांला दिसून

येईल. विद्या आणि बुद्धि ह्या दोन घटकांमुळेच सर्व गोष्टी सुरक्षित राहतात. धर्म आणि तत्त्वज्ञान ह्या दोहोंचें अत्यंत शुद्ध स्वरूपांत जतन करण्याचें कार्य कोणत्याहि समाजांतील सुसंस्कृत वर्गच करीत असतो. धर्म आणि तत्त्वज्ञान ह्यांचें शुद्धतम स्वरूप हें त्या विशिष्ट समाजाच्या बौद्धिक आणि सामाजिक पातळीचें निदर्शक असतें.

८२. अमेरिकेंत स्वामीजी एका प्रसंगीं म्हणाले, "एखाद्या नव्या धर्माची तुम्हांला दीक्षा देण्यासाठी मी आलों नाहीं. तुमच्या धर्मावरील तुमचा विश्वास कायम राहावा हीच माझी इच्छा आहे. मेथॉडिस्ट पंथीयांनी अधिक चांगले मेथॉडिस्ट व्हावें, प्रेस्बिटेरियन पंथीयांनी अधिक चांगले प्रेस्बिटेरियन व्हावें आणि युनिटेरियन पंथीयांनी अधिक चांगले युनिटेरियन व्हावें अशी माझी इच्छा आहे. प्रत्यक्ष जीवनांत सत्य उतरवायला तुम्हांला शिकवावें, तुमच्या आत्म्याच्या ठायीं असलेला प्रकाश प्रकट करायला

तुम्हांला शिकवावें अशी माझी इच्छा आहे."

८३. डोक्यावर जणु दुःखाचा मुकुट चढवून सुख मनुष्यापुढे उभें राहतें. जो सुखाचें स्वागत करतो त्याने दुःखाचेंहि स्वागत केलेंच पाहिजे.

८४. ज्याने जगाकडे पाठ फिरविली आहे, ज्याने सर्वस्वाचा त्याग केलेला आहे, ज्याने वासनांचें दमन केलें आहे आणि ज्याला शांतीची तहान लागलेली आहे तो खरा मुक्त होय, तो खरा थोर होय. एखाद्याला सामाजिक व राजकीय स्वातंत्र्य कदाचित् मिळवितां येईल, परंतु तो जर आपल्या वासनांचा व इच्छांचा गुलाम असेल तर त्याला खऱ्याखुऱ्या मुक्तीचा विशुद्ध आनंद अनुभवतां येणार नाही.

८५. परोपकार करणें हा धर्म होय; दुसऱ्याला पीडा देणें हा अधर्म होय. सामर्थ्य आणि पौरुष हा धर्म होय; दौर्बल्य आणि भेकडपणा हा अधर्म होय. स्वातंत्र्य हा धर्म होय; पारतंत्र्य हा अधर्म होय. दुसऱ्यांवर प्रेम करणें हा धर्म होय; दुसऱ्यांचा द्वेष

करणें हा अधर्म होय. ईश्वरावर आणि स्वत:च्या आत्म्यावर विश्वास ठेवणें हा धर्म होय; संदेह हा अधर्म होय. एकत्वाचें ज्ञान हा धर्म होय; भेद पाहणें हा अधर्म होय. निरनिराळे शास्त्रग्रंथ फक्त या धर्माच्या प्राप्तीचीं साधनें दर्शवितात.

८६. जेव्हा युक्तिवादाच्या योगानें बुद्धि सत्याचें आकलन करते तेव्हा सर्व भावांचें उगमस्थान असलेल्या हृदयांत सत्याचा साक्षात्कार होतो. अशा प्रकारें एकाच क्षणीं बुद्धि आणि हृदय दोन्ही उजळून निघतात; आणि तेव्हाच, उपनिषदांत म्हटल्याप्रमाणे, "हृदयग्रंथि छिन्नभिन्न होते आणि सर्व संशयांचा, संदेहांचा निरास होतो." (मुंडकोपनिषद्——२-२-८)

जेव्हा प्राचीन काळीं हें ज्ञान आणि हा भाव हीं दोन्ही ऋषींच्या अंत:करणांत एकसमयावच्छेदेंकरून उमललीं, तेव्हा सर्वोच्च सत्य काव्यमय बनलें आणि मग वेदादि धर्मग्रंथांची रचना झाली. आणि म्हणूनच त्यांचें अध्ययन करीत असतांना असें जाणवतें की,

भाव आणि ज्ञान ह्या दोन समांतर रेषा सरतेशेवटीं वेदभूमीवर जणुकांही एकमेकींना भेटल्या असून त्या परस्परांत मिसळून गेल्यामुळे अविभाज्य बनल्या आहेत.

८७. निरनिराळ्या धर्मांचे धर्मग्रंथ विश्वप्रेम, मुक्ति, पौरुष आणि निरपेक्ष परोपकारबुद्धि हीं उदात्त ध्येयें गाठण्याचीं भिन्नभिन्न साधनें दाखवून देतात. प्रत्येक धर्मपंथाच्या धर्माधर्माविषयीच्या कल्पना सामान्यतः भिन्न असतात, आणि अंतिम सत्याच्या अनुभूतीचें ध्येय डोळ्यांपुढे ठेवण्याऐवजी, धर्म साधण्याच्या आणि अधर्म टाळण्याच्या साधनांवरून हे धर्मपंथ आपसांत भांडत असतात. प्रत्येक साधन थोड्याफार प्रमाणांत उपयुक्त असतेंच आणि गीतेंत (१८–४८) सांगितलेल्या, "ज्याप्रमाणे अग्नीशीं धूर संलग्न असतो त्याप्रमाणे प्रत्येक कर्माशीं दोष संलग्न असतातच" ह्या तत्त्वाप्रमाणे हीं साधनें थोड्याफार प्रमाणांत सदोष दिसून येतात यांत संदेह नाही. परंतु, ज्याअर्थीं

आपल्याला आपल्या धर्मग्रंथांत सांगितलेल्या साधनांच्या साहाय्याने सर्वश्रेष्ठ धर्माची प्राप्ति करून घ्यावयाची आहे त्याअर्थी त्या साधनांचें कसोशीनें अनुसरण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. तसेंच, ह्या साधनांना बुद्धि आणि विवेक यांची जोड दिली पाहिजे. अशा रीतीनें आपली जसजशी प्रगति होत जाईल तसतसें धर्माधर्माचें कोडें आपोआप उलगडत जाईल.

८८. हल्लीच्या काळांत आपल्या देशांत कितीशा लोकांना शास्त्रें खरोखर समजतात ? आपले लोक ब्रह्म, माया, प्रकृति इत्यादि शब्द--नुसते शब्दच शिकले आहेत आणि या शब्दांनी त्यांच्या डोक्यांत गोंधळच माजला आहे. शास्त्रांचा खरा अर्थ आणि त्यांचें प्रयोजन हीं बाजूलाच राहतात आणि हे लोक नुसत्या शब्दांवरूनच भांडत बसतात. सर्व परिस्थितींत, सर्व काळांत, सर्व माणसांना जर शास्त्रें उपयोगी पडूं शकत नाहीत तर असलीं शास्त्रें काय कामाचीं ? शास्त्रें

जर फक्त संन्याशालाच मार्गदर्शन करीत असतील आणि गृहस्थाला मार्गदर्शन करीत नसतील तर असलीं एकांगी शास्त्रें गृहस्थाश्रमी व्यक्तींच्या काय उपयोगाचीं ? लोकांनी आपलें सर्व कामकाज सोडून देऊन अरण्यांत राहावयास सुरुवात केल्यानंतरच जर शास्त्रें त्यांच्या उपयोगी पडणार असतील, आणि लोक आपलें दैनंदिन व्यावहारिक जीवन जगत असतांना, रोजचे श्रम, रोगराई, दुःख आणि दैन्य यांनी हैराण झाले असतांना, पश्चात्तापाने उद्विग्न झाले असतांना, पददलित झाल्यामुळे आत्मनिंदा करीत असतांना, रणांगणावर भीतिग्रस्त झाले असतांना, काम, क्रोध व सुखोपभोग यांच्या आहारीं गेले असतांना, यशाच्या आनंदाने धुंद झाले असतांना, अपयशाने कष्टी झाले असतांना आणि सरतेशेवटीं त्यांच्यासमोर मृत्यूचें भय उभें ठाकलें असतांना जर हीं शास्त्रें हृदयांत आशेचा दीप प्रज्वलित करण्याचा मार्ग त्यांना दाखवूं शकणार नसतील तर दुबळ्या मानवजातीला असल्या शास्त्रांची

मुतराम् गरज नाही आणि असल्या शास्त्रांना 'शास्त्रें' असें म्हणतांच येणार नाही !

८९. भोगांचा अनुभव घेतल्यानंतर पुढे यथासमय योग प्राप्त होईल. परंतु हाय ! माझ्या देशबांधवांची स्थिति इतकी वाईट आहे की, योगप्राप्तीची गोष्ट दूरच राहो, परंतु त्यांना किंचित् भोगप्राप्तिहि होऊं शकत नाही ! सर्व प्रकारचे अपमान सोशीत, ते शरीराच्या अगदी प्राथमिक गरजा कशाबशा भागवीत आहेत---आणि इतकेंसुद्धा प्रत्येकाला साध्य होत आहे अशांतला भाग नाही ! ही सर्व परिस्थिति पाहूनहि आपली झोप मोडत नाही आणि आपल्या सद्यः-कर्तव्याची प्रेरणा आपल्याला मिळत नाही, हें नवलच आहे !

९०. आपल्या हक्कांसाठी, आपल्या अधिकारां-साठी सदैव कितीहि चळवळ करीत राहा. परंतु हें पक्कें लक्षांत ठेवा की, सबंध देशांत स्वाभिमानाची भावना प्रखरपणें जागवून जोंपर्यंत आपण स्वतःला

उन्नत करीत नाही तोंपर्यंत हक्क-आधिकारांच्या प्राप्तीची आशा बाळगीत राहणें हें निव्वळ ॲल्नॅस्करच्या दिवास्वप्नांसारखें होय.

९१. जेव्हा एखादा प्रतिभाशाली किंवा विशिष्ट सामर्थ्यसंपन्न पुरुष जन्माला येतो तेव्हा त्याच्या पूर्वजांच्या ठिकाणीं असलेल्या उत्तमोत्तम आणि अत्यंत सर्जनशील अशा सर्व शक्ति त्या महापुरुषाचें व्यक्तिमत्त्व घडविण्याच्या कामीं खर्ची पडून, जणुकांही संपुष्टांत येतात. ह्याच कारणाखातर आपल्याला असें आढळून येतें की, अशा कुटुंबांत त्या महापुरुषाच्या मागून जन्माला येणाऱ्या सर्व व्यक्ति एकतर महामूर्ख तरी असतात किंवा अगदी सर्वसाधारण बुद्धिमत्तेच्या असतात आणि कालान्तराने असें कुटुंब नामशेष झाल्याचेंच बहुसंख्य उदाहरणांत आढळून येतें.

९२. जर तुम्हांला ह्या जन्मांत मोक्ष मिळवितां येत नसेल तर ह्यापुढील जन्मांत तो मिळविणें शक्य होईल ह्याला काय आधार आहे ?

९३. आग्र्याचा ताजमहाल पाहतांना स्वामीजी म्हणाले, "येथील एखादा संगमरवरी दगड घेऊन जर तुम्ही तो पिळलांत, तर त्यांतून राजदांपत्याचें प्रेम आणि दुःख खाली ठिबकूं लागेल." ते पुढे म्हणाले, "आंतल्या भागांतील एका चौरस इंचावरील कारागिरींतील सौंदर्याचा अभ्यास करण्यासाठी खरोखरीच सहा महिने लागतील."

९४. भारताचा खरा इतिहास जेव्हा उजेडांत येईल तेव्हा असें सिद्ध होईल की, भारत ज्याप्रमाणे धर्माच्या बाबतींत सबंध जगाचा आद्य गुरु आहे त्याप्रमाणे कलांच्या बाबतींतहि तो उभ्या जगाचा आद्य गुरु आहे.

९५. शिल्पशास्त्रासंबंधी बोलतांना स्वामीजी म्हणाले, "कलकत्ता ही प्रासादनगरी आहे असें लोक म्हणतात, परंतु तेथील घरें एकावर एक ठेवलेल्या अनेक पेटयांप्रमाणे दिसतात! त्यांच्या द्वारें कोणताहि भाव व्यक्त होत नाही. राजपुतान्यांत तुम्हांला अद्यापि

विशुद्ध हिंदु शिल्पकलेचे पुष्कळ नमुने आढळून येतात. तुम्ही तिकडील एखाद्या धर्मशाळेकडे पाहाल तर तुम्हांला असें वाटेल की, ती जणु बाहु पसरून तुम्हांला आपल्या छायेखाली विश्रांति घेण्यास आणि आपल्या विशुद्ध आदरातिथ्याचा स्वीकार करण्यास बोलावीत आहे. तुम्ही एखाद्या मंदिराकडे नजर टाकली तर ईश्वराच्या अस्तित्वाच्या खाणाखुणा तुम्हांला मंदिरांत आणि मंदिराच्या आवतीभोवती आढळून येतील. खेड्यांतील एखाद्या झोपडीकडे तुम्हीं दृष्टि-क्षेप केला तर झोपडीच्या भिन्नभिन्न भागांचा विशिष्ट अर्थ तुमच्या तात्काळ ध्यानांत येईल आणि शिवाय झोपडीच्या समग्र रचनाशिल्पावरून त्या झोपडीच्या मालकाचा आदर्श आणि त्याचें ठळक स्वभाववैशिष्टच हीं दोन्हीं तुम्हांला स्पष्टपणें दिसून येतील. अशा प्रकारची बोलकी शिल्पकला मला इटलीखेरीज अन्यत्र कोठेहि आढळून आली नाही."

९६. एकदा कोणींतरी स्वामीजींना विचारलें,

" स्वामीजी, अहं हें असत्य असून अनेकत्व हेंच सत्य आहे असा बुद्धदेवांनी उपदेश केला, तर सनातन हिंदु-धर्माचें असें निश्चित मत आहे की, तें एकमेव ब्रह्मच सत्य असून अनेकत्व हें असत्य आहे, हें खरें काय ?" स्वामीजींनी त्यावर उत्तर दिलें, "होय, तें खरें आहे. आणि श्रीरामकृष्णांनी व मीं त्यांत अशी भर घातली आहे की, तें ' एक ' आणि ' अनेक ' म्हणजे वस्तुतः एकच सत्ता आहे––फक्त एकाच मनानें वेगवेगळ्या वेळीं व भिन्नभिन्न दृष्टिकोनांतून पाहिल्यामुळे ती कधी 'एक' तर कधी 'अनेक' दिसते, एवढेंच."

९७. एका शिष्याला एकदा स्वामीजी म्हणाले, " लक्षांत ठेवा, चांगल्या रीतीने लक्षांत ठेवा की, ' प्रकृतीसाठी आत्मा नव्हे, तर आत्म्यासाठी प्रकृति ' हा आपल्या भारताचा नित्याचा संदेश आहे."

९८. समोरच्या रस्त्यावर निर्भयपणें उभें राहून ' आमच्यापाशी केवळ ईश्वरच आहे, दुसरें कांही नाही ' असें जगाला छातीठोकपणें सांगू शकतील अशा

वीस स्त्री-पुरुषांची आज जगाला गरज आहे. हें व्रत घ्यायला कोण तयार आहे ? भीतीचें कारणच काय? हें जर खरें असेल, तर इतर गोष्टींची काय पर्वा; आणि हें जर खरें नसेल, तर मग आपल्या जीवनाचा तरी काय उपयोग ?

९९. खरेंच, मनुष्यांतील देवत्वाची ज्याला खरोखरीच ओळख पटलेली आहे त्याचें कार्य किती शांतपणें चाललें असतें! अशा मनुष्याला दुसरें कांहीच करावयाचें नसतें, फक्त लोकांचे डोळे उघडण्याचेंच कार्य त्याला करावयाचें असतें. बाकी सारें आपोआपच घडून येतें.

१००. केवळ तें महान् दिव्य जीवन जगण्यांतच त्यांना ( श्रीरामकृष्णांना ) संतोष होता. त्याची मीमांसा करण्याचें कार्य त्यांनी इतरांवर सोपविलें !

१०१. स्वामीजींचा एक शिष्य जेव्हा एकदा त्यांना व्यावहारिक शहाणपण शिकवूं लागला, तेव्हा चिडून जाऊन स्वामीजी उद्‌गारले "योजना ! योजना !

म्हणूनच पाश्चिमात्य लोकांना कधीच धर्म निर्माण करतां येत नाही! ज्यांच्याजवळ कांही योजना नव्हत्या असे तुमच्यापैकी फक्त मूठभर कॅथॉलिक संतच धर्म निर्माण करूं शकले. योजना करणाऱ्यांनी कधीच धर्माचा प्रचार केला नाही."

१०२. पश्चिमेंतील सामाजिक जीवन खळाळणाऱ्या हास्याने फुललेलें आहे; परंतु, त्याच्या बुडाशीं दु:ख, शोक, आक्रंदन आहे. त्याचा अंत हुंदक्यांत होतो. मौज, चैन, ह्या साऱ्या वरपांगी गोष्टी आहेत; खरें पाहतां त्यांत अत्यंत उत्कट असें दु:खच भरलेलें आहे. आता, येथील जीवन वरवर दु:खमय, विषादपूर्ण दिसतें खरें; परंतु, त्याच्या तळाशीं निश्चितपणा व आनंद आहे.

आपल्यांत असा एक सिद्धान्त आहे की, परमेश्वराने केवळ गंमत म्हणून ह्या विश्वाच्या रूपाने स्वत:ला प्रकट केलें आणि 'केवळ गंमत म्हणूनच' त्याने पृथ्वीवर अवतार घेतले. ती सारी लीला, क्रीडा

होती. येशू ख्रिस्तांना सुळावर कां चढविण्यांत आलें ? तीहि केवळ एक क्रीडाच होती. जीवन म्हणजे क्रीडाच आहे. परमेश्वराशीं सहज गंमत म्हणून अमळ खेळा. म्हणा की 'ही सारी क्रीडा आहे, ही सारी क्रीडा आहे.' तुम्ही स्वत: कांही करतां काय ?

१०३. खरा पुढारी एका जन्मांत तयार होत नसतो असें माझें मत आहे. पुढारी हा जन्मावाच लागतो. कारण, लोकांची संघटना करणें, कार्याची योजना आखणें ह्या गोष्टी कांही कठीण नसतात; भिन्न भिन्न स्वभावांच्या लोकांना त्या सगळ्यांच्या जिव्हाळ्याच्या कार्यांचे निमित्ताने एका सूत्रांत गोवून ठेवणें यांतच पुढाऱ्याच्या कर्तृत्वाची खरीखुरी कसोटी असते. आणि ही गोष्ट नकळत साध्य होत असते, प्रयत्नांनी ती कधीच साध्य होत नाही.

१०४. प्लेटोच्या कल्पनाविषयक सिद्धान्ताचें विवरण करतांना एकदा स्वामीजी म्हणाले- —"म्हणून तुमच्या लक्षांत येईल की, महान् कल्पना ह्याच खऱ्या

व पूर्ण स्वरूपाच्या असतात. हें सारें म्हणजे त्या महान् कल्पनांचें अत्यंत क्षीण असें मूर्त रूप होय. 'आदर्श स्वरूपाचे तुम्ही' कोठेतरी आहांत आणि या जगांत तुमच्यामधून त्याच्या आविष्करणाची धडपड चालूं आहे. तरी पण अजूनहि हा प्रयत्न कित्येक दृष्टींनी थिटा पडत आहे. तरीहि, पुढे चला! एखाद्या दिवशीं तरी तुम्हांला तो आदर्श व्यक्त करतां येईलच."

१०५. एकदा स्वामीजींच्या एका शिष्येने पुढील शब्दांत आपलें मनोगत व्यक्त केलें—"मला जर इहलोकीं पुन:पुन: जन्म घेतां आला तर फार बरें वाटेल. कारण तसें घडून आलें तर ह्या जीवनाच्या कटकटींतून सुटण्याच्या इच्छेने वैयक्तिक मुक्तीसाठी धडपडण्याऐवजी माझ्या दृष्टीने जिव्हाळ्याचे असलेले प्रश्न सोडविण्यास मी मदत करूं शकेन." ह्यावर स्वामीजी चटकन् उत्तरले--तुम्हांला असें वाटतें त्याचें कारण हेंच की तुम्ही प्रगतीच्या कल्पनेच्या पलीकडे जाऊं शकत नाही. खरें म्हणजे आसपासची परिस्थिति

सुधारली आहे असें कधीच होत नाही. ती जशी होती तशीच राहते. परंतु परिस्थितींत बदल केल्यामुळे आपणच सुधारत असतों."

१०६. ती अल्मोऱ्यांतील गोष्ट आहे. एकदा कोणी एक प्रेमळ, दुबळा, वयस्कर मनुष्य स्वामीजींकडे आला व कर्मविषयक एक प्रश्न त्याने त्यांना विचारला. त्याचा प्रश्न होता--"बलवान् दुर्बळांना छळतात हें बघण्याचेंच ज्यांच्या कर्मांत आहे अशांनी काय करावें?" आश्चर्यचकित होऊन स्वामीजी चिडून त्याला म्हणाले, "यांत काय विचारायचें? बलवानांना झोडपा. या कर्मप्रसंगी तुम्ही स्वतःचें कर्तव्य विसरतां. बलवानांचा प्रतिकार करणें हा तुमचा नेहमीचा हक्कच आहे!"

१०७. 'न्यायाचें समर्थन करण्यासाठी झगडतांना एखाद्याने प्राणार्पण करणें चांगलें की त्याने गीतेच्या उपदेशानुसार वागून कधीहि प्रतिकार न करण्यास शिकणें चांगलें?'—असा एकदा स्वामीजींना कुणीतरी

प्रश्न केला. बराच वेळ थांबून स्वामीजी आस्ते आस्ते म्हणाले—"प्रतिकार करूं नये ह्या मताचा मी आहें." त्यानंतर ते पुढे आणखी म्हणाले—"अर्थात् संन्याशांनी प्रतिकार करूं नये असें माझें मत आहे. पण गृहस्थाश्रमी व्यक्तींनी जरूर स्वसंरक्षण करावें!"

१०८. सुखाची प्राप्ति व्हावी असा सगळ्याच माणसांचा उद्देश असतो असें मानणें चुकीचें आहे. दुःखाचा शोध घेण्यासाठी जन्मलेलेहि कांही थोडे नसतात. ईश्वराच्या भयंकर रूपाची उपासना करण्यासाठीच आपण त्या रूपाची उपासना करूं या.

१०९. आपण सर्व लोकांशीं त्यांच्याच भाषेंत बोललें पाहिजे असें प्रतिपादण्याचें धैर्य फक्त एकाच व्यक्तींत होतें आणि ती म्हणजे श्रीरामकृष्ण!

११०. कालीमातेला आदर्श मानण्याच्या बाबतींत ज्या काळांत स्वामीजींच्या मनांत शंकाकुशंकांनी वादळ निर्माण केलें होतें त्या काळाचा निर्देश करून ते एकदा म्हणाले—"मी त्या वेळीं कालीमातेचा किती

तिटकारा करीत असे आणि तिच्या त्या साऱ्या आचारविचारांचाहि ! मी तिला मानणार नाहीं ह्या एका मुद्यावर मी सतत सहा वर्षं झगडत होतों. परंतु सरतेशेवटीं मला कालीमातेला मानावेंच लागलें ! श्रीरामकृष्णांनी मला तिच्या चरणीं अर्पिलें आणि आता मला असें खात्रीपूर्वक वाटतें की, मी जें जें कांही करतों त्या त्या बाबतींत ती मला मार्गदर्शन करते व तिच्या इच्छेप्रमाणे ती मजकडून काम करवून घेते.... तरीदेखील मी तेव्हा इतका झगडलों ! तुम्हांला खरें सांगतो की, माझें त्यांच्यावर प्रेम होतें व त्यामुळेच मी त्यांच्याजवळ राहिलों. त्यांचें तें लोकविलक्षण पावित्र्य मीं बघितलें....मीं त्यांच्या त्या अद्‌भुत प्रेमाचा अनुभव घेतला....तोंपर्यंत त्यांचा मोठेपणा मला उमगलेला नव्हता. मी शरण गेल्यावर त्या साऱ्या गोष्टी मला कळून आल्या. सुरुवातीला ते मला सदैव काल्पनिक दृश्यें पाहणाऱ्या एखाद्या भ्रमिष्ट मुलासारखे वाटत. मला त्या सगळ्याच गोष्टींचा

प्रश्न केला. बराच वेळ थांबून स्वामीजी आस्ते आस्ते म्हणाले—"प्रतिकार करूं नये ह्या मताचा मी आहें." त्यानंतर ते पुढे आणखी म्हणाले—"अर्थात् संन्याशांनी प्रतिकार करूं नये असें माझें मत आहे. पण गृहस्थाश्रमी व्यक्तींनी जरूर स्वसंरक्षण करावें!"

१०८. सुखाची प्राप्ति व्हावी असा सगळ्याच माणसांचा उद्देश असतो असें मानणें चुकीचें आहे. दुःखाचा शोध घेण्यासाठी जन्मलेलेहि कांही थोडे नसतात. ईश्वराच्या भयंकर रूपाची उपासना करण्यासाठीच आपण त्या रूपाची उपासना करूं या.

१०९. आपण सर्व लोकांशीं त्यांच्याच भाषेंत बोललें पाहिजे असें प्रतिपादण्याचें धैर्य फक्त एकाच व्यक्तींत होतें आणि ती म्हणजे श्रीरामकृष्ण!

११०. कालीमातेला आदर्श मानण्याच्या बाबतींत ज्या काळांत स्वामीजींच्या मनांत शंकाकुशंकांनी वादळ निर्माण केलें होतें त्या काळाचा निर्देश करून ते एकदा म्हणाले—"मी त्या वेळीं कालीमातेचा किती

तिटकारा करीत असे आणि तिच्या त्या साऱ्या आचारविचारांचाहि ! मी तिला मानणार नाहीं ह्या एका मुद्यावर मी सतत सहा वर्षें झगडत होतों. परंतु सरतेशेवटीं मला कालीमातेला मानावेंच लागलें ! श्रीरामकृष्णांनी मला तिच्या चरणीं अर्पिलें आणि आता मला असें खात्रीपूर्वक वाटतें की, मी जें जें कांही करतों त्या त्या बाबतींत ती मला मार्गदर्शन करते व तिच्या इच्छेप्रमाणे ती मजकडून काम करवून घेते. . . . तरीदेखील मी तेव्हा इतका झगडलों ! तुम्हांला खरें सांगतो की, माझें त्यांच्यावर प्रेम होतें व त्यामुळेच मी त्यांच्याजवळ राहिलों. त्यांचें तें लोकविलक्षण पावित्र्य मीं बघितलें. . . .मीं त्यांच्या त्या अद्भुत प्रेमाचा अनुभव घेतला. . . .तोंपर्यंत त्यांचा मोठेपणा मला उमगलेला नव्हता. मी शरण गेल्यावर त्या साऱ्या गोष्टी मला कळून आल्या. सुरुवातीला ते मला सदैव काल्पनिक दृश्यें पाहणाऱ्या एखाद्या भ्रमिष्ट मुलासारखे वाटत. मला त्या सगळ्याच गोष्टींचा

विलक्षण तिटकारा वाटत असे. परंतु मग मलाहि कालीमातेला मानावें लागलें !

"नाही, ज्या गोष्टीमुळें मी असें केलें ती मी माझ्या जीवनाच्या अखेरपर्यंत कोणाला सांगणार नाहीं. त्या काळांत मी मोठ्या दुर्दैवाच्या फेऱ्यांत सापडलों होतों....ती सुवर्णसंधिच होती....तिने मला दासानुदास बनविलें. 'हा तुझा गुलाम' हेच ते शब्द होते आणि श्रीरामकृष्णांनी मला तिच्या स्वाधीन केलें....किती चमत्कारिक! आणि त्यांनी तसें केल्यानंतर ते फक्त दोनच वर्षें जगले आणि त्या काळांतहि त्यांना अतिशय क्लेश होत असत. ते आपला निरोगीपणा व आपल्या शरीराचा तेजःपुंजपणा सहा महिने कांही टिकवून धरूं शकले नाहीत.

"गुरु नानकहि अशाच एकमेव शिष्यांच्या शोधांत होते हें तुम्हांला ठाऊक आहे काय ? आपलें सगळें सामर्थ्य त्या शिष्योत्तमालादेऊन टाकावें अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या सबंध कुटुंबांत अशी योग्य

व्यक्ति त्यांना कोणीच आढळली नाही. त्यांचीं मुलेंहि त्यांच्या दृष्टीने निरुपयोगी होतीं. सरतेशेवटीं एक मुलगा त्यांना आढळला, त्याला त्यांनी आपलें सारें सामर्थ्य दिलें व मगच त्यांना मरण आलें.

"पुढच्या पिढया श्रीरामकृष्णांना कालीमातेचा अवतार मानतील असें तुमचें म्हणणें आहे ना ? खरें आहे तें. तिनेच आपलीं उद्दिष्टें साधण्यासाठी श्रीरामकृष्णांच्या देहाच्या द्वारें कार्य केलें यांत कांही शंका नाही असें मला वाटतें.

"मला असें अगदी खात्रीपूर्वक वाटतें की, कुठेतरी काली अथवा जगन्माता नांवाची एक महान् शक्ति असून ती स्वतःला स्त्रीरूपी समजत आहे....आणि माझा ब्रह्मावरहि विश्वास आहे....पण नेहमी असेंच नसतें का? शरीरांतील पेशींच्या समूहामुळेच मनुष्याला व्यक्तित्व प्राप्त होत नाही काय ? मेंदूच्या एका नव्हे, तर अनेक केंद्रांमुळेच मनुष्यामधे ज्ञान उत्पन्न होत नाही काय ?... विविधतेंत एकत्व ! होय, हेंच सत्य

आहे ! आणि ब्रह्माचेंहि स्वरूपहि असेंच कां नसावें ? तेंच ब्रह्म आहे. तें एकमेव आहे. आणि तरीहि तेंच विभिन्न देवदेवता आहे !"

१११. जसजसें माझें वय वाढत आहे तसतसें सारेंकांही पुरुषत्वांतच सामावलेलें आहे हें मला कळूं लागलें आहे. ही माझी नवीन शिकवण आहे.

११२. नरमांसभक्षण करणें हा कांही जमातींत एक सर्वसामान्य प्रघात होता अशा प्रकारच्या एका युरोपीय उल्लेखाचा निर्देश करून स्वामीजी म्हणाले, "तें कांही खरें नव्हे ! धार्मिक यज्ञविधि आणि युद्धांतील सुडाचे प्रसंग वगळतां कोणत्याहि जातींतील लोकांनी कधीहि नरमांसभक्षण केलें नाही, हें तुमच्या लक्षांत येत नाही काय ? कळप करून राहणारे प्राणी तसे कधीच वागत नसतात ! ते तसें वागल्यास सामाजिक जीवन मुळापासूनच उध्वस्त होईल !"

११३. स्त्रीपुरुषामधील प्रेम आणि उत्पत्ति ! बहुसंख्य धर्मांच्या बुडाशीं याच गोष्टी आहेत. ह्यांना

भारतांत 'वैष्णवमत' म्हणतात व पश्चिमेकडील देशांत 'ख्रिस्ती धर्म' म्हणतात. मृत्यूची अगर कालीची उपासना करण्याचें धैर्य असणारे थोडेच! आपण मृत्यूची उपासना करूं या! जें भयंकर आहे त्यास सौम्य होण्याची प्रार्थना न करतां, तें भयंकर आहे म्हणूनच त्यास आलिंगूं या. दुःखाचा दुःख म्हणूनच आपण स्वीकार करूं या!

११४. धर्माचीं पांचशें वर्षें, मूर्तींचीं पांचशे वर्षें व तंत्रांचीं पांचशे वर्षें अशीं बौद्ध धर्मांतील तीन आवर्तनें होत. स्वतःचीं मंदिरें व स्वतःचा धर्मोपदेशकांचा वर्ग असलेला बौद्धधर्म नांवाचा एक धर्म भारतांत होता अशी तुम्ही मुळीच कल्पना करून घेऊं नका. असें कांहीच नव्हतें. तो नेहमी हिंदुधर्माच्या अंतर्गतच होता. कांही काळ बुद्धदेवांचा प्रभाव शिगेला पोहोचला होता, इतकेंच. आणि त्यामुळे उभा देश संन्यासी बनला.

११५. सहन करीत राहणें हेंच पुराणमताभिमानी

लोकांचें संपूर्ण ध्येय आहे तर झगडणें हें तुमचें ध्येय आहे. परिणामीं, आम्हीच जीवनाचा उपभोग घेऊं शकतों, तुम्हांला तो कधीच घेतां येत नाही ! तुम्ही नेहमीच तुमचें ऐहिक जीवन प्रगत करण्यासाठी धड-पड करीत असतां आणि ह्या धडपडींत एक दशलक्षांश प्रगति साधली जाते न जाते तोंच तुम्ही मरतां. कार्य करीत राहणें हें पश्चिमेचें ध्येय आहे, तर सोशीत राहणें हें पूर्वेचें ध्येय आहे. कर्म करणें आणि सहन करीत राहणें या दोहोंत पूर्ण समन्वय साधल्यास जीवन परिपूर्ण होईल. पण तें कधीच साध्य होत नाही.

मनुष्याच्या सगळ्याच इच्छा पूर्ण होत नसतात असें आम्ही मानतों. आमच्या जीवनावर अनेक नियं-त्रणें असतात हें घृणास्पद आहे हें खरें, तथापि त्यांतून अनेक प्रकाशकिरणें आणि सामर्थ्य हीं प्रकट होतात. आमच्याकडील प्रागतिकांना फक्त घृणास्पद भाग तेवढाच दिसतो व तो ते दूर भिरकावूं पाहतात. परंतु, जे नवीन प्रघात ते जुन्यांच्या जागीं रुळवूं

पाहतात ते जुन्याइतकेच वाईट असतात आणि ते राबविण्यासहि तितकेच परिश्रम करावे लागतात.

परिवर्तनामुळे इच्छाशक्तीला कधीच बळकटी येत नसते. उलट त्यामुळे ती क्षीण होऊन गुलाम बनते, परंतु, आपण नेहमी आत्मसात् करीत गेलें पाहिजे, कारण तसें केल्यानेच इच्छाशक्ति अधिक बळकट होते. जगांत इच्छाशक्ति हीच अशी एकमेव गोष्ट आहे की जिच्याबद्दल आपल्याला आदर वाटतो— मग याची आपल्याला जाणीव असो वा नसो. सबंध जगाच्या दृष्टीने सती जाणारी स्त्री ही श्रेष्ठ असते, कारण तिच्या ठिकाणीं जबरदस्त इच्छाशक्ति प्रकट झालेली दिसते.

स्वार्थपरायणता नाहीशी करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. माझ्या आयुष्यांत जेव्हा जेव्हा माझ्या हातून चूक झाली तेव्हा तेव्हा स्वार्थ मध्ये घुसल्या-मुळेच ती घडून आली असें मला अनेक अनुभवांवरून आढळून आलें आहे. जेव्हा स्वार्थाने लुडबूड केली

नाही, तेव्हा माझे निर्णय बिनचूक खरे ठरले.

स्वार्थ नसता तर कोणताच धर्मपंथ उदयास आला नसता. मनुष्याला स्वत:साठी जर कशाचीहि जरूरी भासली नसती तर ह्या प्रार्थना, पूजाअर्चा इत्यादींचा पसारा त्याने मांडला असता काय ? इतकेंच काय, पण त्याला मग ईश्वराचा विचार सुद्धा सुचला नसता. एखादें निसर्गसुंदर दृश्य दृष्टीस पडल्यावर त्याने ईश्वराची स्तुति केली असती, इतकेंच. आणि माणसाची मनोभूमिका नेमकी हीच असली पाहिजे, ईश्वराची त्याने नेहमी स्तुति केली पाहिजे, ईश्वराचे त्याने नेहमी आभार मानले पाहिजेत. आपली स्वार्थातून सुटका झाली असती तर किती चांगलें झालें असतें !

झगडणें हें विकासाचें द्योतक आहे असें जें तुम्हांला वाटतें तें पूर्णपणें चुकीचें आहे. तें तसें मुळीच नाही. आत्मसात् करणें हें विकासाचें खरें द्योतक आहे. हिंदुधर्माला हें आत्मसात् करणें पूर्णपणें साधलें आहे.

आम्हीं झगडण्याची कधीच पर्वा केली नाही. अर्थात्, आम्ही आमच्या देशाच्या संरक्षणासाठी मधूनमधून युद्धें केलीं आहेत, नाही असें नाही ! तें योग्यहि होतें. परंतु युद्धासाठी युद्ध असा विचार आम्हीं कधीच केलेला नाही. प्रत्येकाला हा धडा शिकावा लागला. म्हणून ह्या नव्या नव्या जातींना तूर्त धडपडूं द्या ! सरतेशेवटीं त्या सर्व हिंदुधर्मांत आत्मसात् करून घेण्यांत येतील !

११६. केवळ मानवाऱ्याच नव्हे, तर सर्व प्राण्यांच्या आत्म्यांची समष्टि म्हणजे सगुण ईश्वर होय. ह्या ईश्वराच्या इच्छेचा कोणीच प्रतिकार करूं शकत नाही. ह्यालाच आपण 'नियम' असें म्हणतों. या सगुण ईश्वराचींच शिव, काली इत्यादि नांवें आहेत.

११७. 'भयंकरा'ची उपासना करा ! मृत्यूची उपासना करा ! बाकी सारेंकांही व्यर्थ आहे. सारी धडपड व्यर्थ आहे. हाच शेवटचा धडा आहे. अर्थात् हें भेकडाचें मृत्यूवरील प्रेम नव्हे, अथवा दुर्बळ माणसानें

केलेलें प्रेम नव्हे किंवा आत्महत्या नव्हे. ज्याला सर्व गोष्टींचें आमूलाग्र आकलन झालेलें आहे व दुसरा कांहीएक पर्याय उरलेला नाही असें ज्याला जाणवलेलें आहे अशा अत्यंत बलवान माणसाने केलेलें मृत्यूचें हें स्वागत आहे.

११८. जे लोक आपापल्या खुळचट समजुती माझ्या देशांतील लोकांना परत प्रदान करतात त्यांच्याशीं मी सहमत नाहीं. इजिप्तचा अभ्यास करणाऱ्याला ज्याप्रमाणे इजिप्तबद्दल जिव्हाळा वाटतो, त्याप्रमाणे एखाद्याला भारताबद्दल जिव्हाळा वाटणें शक्य आहे, परंतु हा जिव्हाळा स्वार्थाने भरलेला असतो. आपण अभ्यासिलेल्या पुस्तकांत वर्णिलेला भारत आपल्याला पुन: पाहायला मिळावा, आपण ज्याचीं स्वप्नें आपल्या मनाशीं रंगविलीं आहेत तो भारत पुन: बघावयास मिळावा अशी एखाद्याला इच्छा होणें शक्य आहे. परंतु माझी अशी इच्छा आहे की प्राचीन भारताचे जे विशेष गुण होते त्यांत आधुनिक

युगाच्या वैशिष्टयपूर्ण गुणांची भर पडावी आणि अशा रीतीने भारताचे पूर्वीचे गुण सहज रीतीने बळकट व्हावे. भारताचा आंतूनच विकास होऊन नवभारत निर्माण व्हावयास हवा.

म्हणून मी फक्त उपनिषदांचाच प्रचार करतों. तुम्ही बारकाईने पाहिलें असल्यास तुम्हांला असें आढळलें असेल की, उपनिषदांतील अवतरणांखेरीज दुसरें कोणतेंहि अवतरण मीं कधीच दिलेलें नाही. आणि उपनिषदांतील कल्पनांपैकी सामर्थ्याच्या कल्पनेचाच मीं अधिक प्रचार केला आहे. वेद, वेदान्त व इतर सारें तत्त्वज्ञान ह्या सगळ्यांचें सार 'सामर्थ्य' या एकाच शब्दांत सामावलेलें आहे. अप्रतिकार किंवा अहिंसा हा भगवान बुद्धांचा उपदेश होता. परंतु मला असें वाटतें की, सामर्थ्याची शिकवण देणें हाच अहिंसा शिकविण्याचा अधिक चांगला मार्ग आहे. कारण तथाकथित अहिंसेमागे भयंकर दुबळेपणा दडलेला असतो. दुबळेपणामुळेच प्रतिकाराची कल्पना सुचते.

सागराच्या एखाद्या तुषारबिंदूपासून दूर पळून जावें किंवा त्याला शिक्षा द्यावी असें मला वाटत नाही, कारण माझ्या दृष्टीने तो बिंदु यःकश्चित् आहे. पण तोच बिंदु एखाद्या मच्छराला महत्त्वाचा वाटतो. सगळ्या प्रकारच्या हिंसेला मी यःकश्चित् लेखीन. सामर्थ्य आणि निर्भयता यांचीच आवश्यकता आहे. बंडांत जेव्हा एका साधूच्या उरांत सुरी खुपसून त्याला ठार करण्यांत आलें तेव्हा त्याने आपल्या मौनाचा भंग करून मारेकऱ्याला इतकेंच म्हटलें--"तूंहि तोच परमेश्वर आहेस !" हा साधुच माझा आदर्श आहे.

पण तुम्ही मला विचाराल--'तुमच्या ह्या कार्याच्या योजनेंत श्रीरामकृष्णांचें स्थान कोणतें ?'

ही योजना कार्यांत कशी आणावी हें त्यांनी प्रत्यक्ष रीतीने दाखवून दिलें आहे. आपल्या अद्भुत जीवनांत त्यांनी ही गोष्ट अगदी न कळतच दाखवून दिली आहे. त्यांनी जें कांही केलें त्याची त्यांना जाणीव नव्हती. इंग्लंड देश अथवा इंग्रज लोक ह्यासंबंधी

त्यांना कांहीच माहिती नव्हती. सातासमुद्रापलीकडे राहणारीं तीं विचित्र माणसें आहेत इतकेंच त्यांना ठाऊक होतें. पण ते महान्, दिव्य जीवन जगले; आणि मीं त्याचा अर्थ लावला. एका शब्दाने कधी त्यांनी कुणाचा धिक्कार केला नाही! अघोर कर्मे करणाऱ्या एका पंथावर मीं एकदा टीकास्त्र सोडलें होतें. मीं सतत तीन तास भडिमार चालविला होता, पण ते माझें सारें बोलणें शांतपणें ऐकत होते. माझा भडिमार थांबल्यावर ते म्हणाले, 'असें पाहा, प्रत्येक घराला एखादा मागचा दरवाजा असतोच. हा पंथ देखील तसाच नसेल हें कशावरून?'

सर्वसंगपरित्याग आणि मुक्ति हे दोनच शब्द हिंदु-धर्माला ठाऊक आहेत आणि हीच त्याची आजवर एक मोठी चूक होत आली आहे. येथे फक्त मुक्तीचीच शिकवण आहे! गृहस्थाश्रमी व्यक्तींसाठी येथे कांहीच नाही.

परंतु ह्याच लोकांना मला मदत करावीशी वाटते.

कारण असें की, सगळे आत्मे समान नाहीत काय? सगळ्यांचें ध्येय एकच नाही काय?

म्हणून देशाला शिक्षणाच्या द्वारें सामर्थ्य प्राप्त व्हावयास हवें.

११९. सर्वोच्च कल्पना सर्वसामान्यांच्या घरोघरीं पोहोचविण्यासाठी हिंदुधर्मात पुराणांची रचना झाली असें स्वामीजींचें मत होतें. ही गरज फार पूर्वी फक्त एकाच व्यक्तीने ओळखली होती आणि ती व्यक्ति म्हणजे श्रीकृष्ण ही होय. श्रीकृष्णांसारखा थोर पुरुप कदाचित् या जगांत झाला नसेल.

स्वामीजी म्हणाले, "ईश्वरी साक्षात्काराकडे नेणाऱ्या विष्णूच्या उपासनेंत पर्यवसित होणाऱ्या धर्माची अशाप्रकारें निर्मिति झाली. ही उपासना जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी आणि सुखांचा उपभोग घेण्यासाठी केली जाते. चैतन्यसंप्रदायाची आपली अखेरची धार्मिक चळवळ ही सुखोपभोगासाठी होती हें तुम्हांला स्मरत असेल. उलटपक्षीं जैनधर्म दुसऱ्या

टोकाला जातो. स्वत:च्या शरीराला क्लेश देऊन त्याचा हळूहळू नाश करणें ही जैनधर्माची शिकवण आहे. म्हणूनच बौद्धधर्म म्हणजे जैनधर्माची सुधारलेली आवृत्ति आहे हें तुमच्या लक्षांत येईल; आणि देहाला दंड देणाऱ्या पांच तपस्व्यांची संगत बुद्धदेवांनी सोडून दिली ह्याचा खरा अर्थ हाच आहे. आत्यंतिक शारीरिक क्लेशांपासून तों आत्यंतिक शारीरिक सुखोपभोगापर्यंतचे सर्वप्रकारचे शारीरिक आचार शिकविणारे धर्मसंप्रदाय भारतांत प्रत्येक युगांत एकामागून एक उदयास येत असतात. आणि इंद्रियांना साधनभूत मानण्यापासून तों इंद्रियनाशापर्यंतच्या सर्वप्रकारच्या साधनांनी ईश्वरसाक्षात्कार होतो असें शिकविणारीं तत्त्वज्ञानेंदेखील त्याच युगांत निर्माण होत असतात. अशाप्रकारें हिंदुधर्मांत जणुकांही एकाच आंसाभोवती वर्तुळाकार फिरत फिरत वर जाणाऱ्या परस्परपूरक अशा दोन गतींचा सर्वदा समावेश होतो.

"वैष्णव संप्रदाय म्हणतो, 'होय, तें सगळें योग्य आहे! हें पित्याविषयी, मातेविषयी, भावाविषयी, पतीविषयी अथवा मुलाविषयी वाटणारें अनिवार प्रेम योग्य आहे! श्रीकृष्ण हा तुमचा मुलगा आहे आणि तुम्ही जेव्हा आपल्या मुलाला खाऊं घालतां तेव्हा तुम्ही श्रीकृष्णालाच खाऊं घालीत आहांत असें जर तुम्हीं मानलें तर तें योग्यच होय!' चैतन्य संप्रदाय आवर्जून सांगत असे की 'इंद्रियांच्या साहाय्यानेच ईश्वराची उपासना करा,' तर उलट वेदान्त बजावीत असे, 'इंद्रियनिग्रह करा! इंद्रियदमन करा!'

"मला असें दिसत आहे की, भारत हा तरुण आहे आणि जिवंत आहे. युरोपहि तरुण व जिवंत आहे. त्यांच्यापैकी कुणालाहि अद्यापि पुरेशी विकासावस्था प्राप्त झालेली नाही. म्हणून त्यांच्या सामाजिक पद्धतींवर आपल्याला बिनधोकपणें टीका करतां येत नाही. हे म्हणजे दोन प्रचंड प्रयोग आहेत; त्यांच्यापैकी कोणताच प्रयोग अद्यापि पूर्ण झालेला नाही.

भारतांत आपल्याला समाजदृष्टया साम्यवाद आढळतो आणि त्याच्या भोवती अद्वैताचा म्हणजेच आध्यात्मिक व्यक्तिवादाचा प्रकाश खेळत असलेला दिसतो. युरोपांत तुम्ही समाजदृष्टया व्यक्तिवादी आहांत; परंतु तुमचे विचार मात्र द्वैतवादी असल्यामुळे तुम्ही आध्यात्मिकदृष्टया साम्यवादी आहांत. अशाप्रकारें एका देशांत समाजवादी जीवनपद्धति असून ती व्यक्तिवादी विचारांनी घेरलेली आहे, तर दुसऱ्या देशांत साम्यवादी विचारांनी घेरलेली व्यक्तिवादी जीवनपद्धति आहे.

"आता जो भारतीय प्रयोग चालूं आहे त्याला त्याच स्वरूपांत आपण हातभार लावावयास हवा. देश ज्या स्थितींत असेल त्याच स्थितींत त्याला साहाय्य करण्याचा यत्न ज्या चळवळी करीत नाहीत त्या चळवळी त्या दृष्टीने निरुपयोगी आहेत. उदाहरणार्थ, युरोपांतील विवाहित जीवनाबद्दल, तसेंच अविवाहित जीवनाबद्दल मला सारखाच आदर

वाटतो. माणसाला मोठेपणा व पूर्णता प्राप्त करून देण्यास त्याचे गुण जितके कारणीभूत होतात तितकेच त्याचे दोषहि कारणीभूत होत असतात हें विसरूं नका. म्हणून जरी एखाद्या देशाचें स्वभाववैशिष्टय पूर्णपणें सदोष आहे असें आपल्याला सिद्ध करता आलें तरी तें स्वभाववैशिष्टय नष्ट करण्याचा आपण यत्न करूं नये."

१२०. मूर्ति म्हणजेच देव असें तुम्हीं म्हटल्यास कांही हरकत नाही, परंतु देव म्हणजे मूर्ति असला चुकीचा विचार करावयाचें मात्र तुम्हीं टाळलें पाहिजे.

१२१. हॉटेंटॉट जमातीच्या निकृष्ट प्रकाराच्या मूर्तिपूजेचा ( Fetishism चा ) स्वामीजींनी निषेध करावा अशी कोणींतरी त्यांना एकदा विनंती केली. त्यावर त्यांनी उत्तर दिलें--" अशा प्रकारची मूर्तिपूजा म्हणजे काय तें मला ठाऊक नाही ! " त्यानंतर, ज्या वस्तूची आधी पूजा होत असे, मग जिला बडवून काढलें जात असे व मग जिच्याविषयी कृतज्ञता व्यक्त

केली जात असे अशा एका वस्तूचें एक भयानक चित्र स्वामीजींपुढे झटकन्‌ ठेवण्यांत आलें. त्यावर ते अचानकपणें उद्‌गारले, "मी तेंच करतों !" आणि एका क्षणानंतर, मागासलेल्या व समोर नसलेल्या लोकांवर होणाऱ्या अन्यायाबद्दल तीव्रपणें नापसंती व्यक्त करून ते म्हणाले, "त्यांत निकृष्ट प्रकारची मूर्तिपूजा वगैरे कांहीहि नाही हें तुमच्या लक्षांत येत नाही काय ? तुमचीं मनें पोलादासारखीं कठीण बनलीं आहेत. त्यामुळेच, ती बालसदृश जमात बरोबर वागत आहे हें तुमच्या लक्षांतच येत नाही ! लहान मुलाला सर्वत्रच जिवंत व्यक्ति दिसते. ज्ञानाने आपली ही बालकाची दृष्टि हिरावून घेतली आहे. परंतु सरतेशेवटीं तें परमोच्च ज्ञान प्राप्त होतांच ती दृष्टि आपल्याला पुनश्च लाभेल. खडक, काठ्या, झाडेंझुडपें इत्यादि सगळ्यांत जिवंत शक्ति आहे असें लहान मूल मानतें आणि या सगळ्या वस्तूंच्या मागे खरोखरीच तशी शक्ति नाही काय? ती निकृष्ट प्रकारची

मूर्तिपूजा नव्हे, तर ती प्रतीकोपासना होय! हें तुमच्या ध्यानांत येत नाही काय?"

१२२. एकदा स्वामीजी सत्यभामेची गोष्ट सांगत होते. सत्यभामेने यज्ञ केला. 'कृष्ण' हा शब्द एका कागदावर लिहून तो कागद तराजूच्या एका पारड्यांत टाकला. दुसऱ्या पारड्यांत स्वतः कृष्ण बसले होते तरी तें पारडें हलकें होऊन वर गेलें. ही गोष्ट सांगून स्वामीजी म्हणाले, "सनातन हिंदुधर्म श्रुतीला सर्वांत महत्त्वाचें मानतो. कोणतीहि वस्तु म्हणजे आधी-पासूनच अस्तित्वांत असलेल्या व चिरंतन स्वरूपाच्या भावाचा केवळ अस्पष्ट असा आविष्कार होय. म्हणून ईश्वराचें नांव हेंच सारेंकांही आहे; स्वतः ईश्वर म्हणजे शाश्वत मनांत असणाऱ्या त्या विशिष्ट भावाचें केवळ मूर्त रूप होय. तुमच्या व्यक्तित्वापेक्षा तुमचें स्वतःचें नांव हें अनंतपटीने अधिक परिपूर्ण आहे! ईश्वराचें नांव हें ईश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणून तुम्ही काय बोलतां याविषयी सावधगिरी बाळगा!"

१२३. ग्रीकांचे देव मानवजातीहून भिन्न असल्यामुळे त्यांचीहि मी उपासना करणार नाहीं. जे देव आपल्यासारखे आहेत पण आपल्याहून श्रेष्ठ आहेत, फक्त अशा देवांचीच उपासना केली पाहिजे. देव आणि मी यांच्यांतला फरक फक्त प्रमाणाचाच असला पाहिजे.

१२४. एखादा दगड पडतो आणि त्याच्या खाली एखादा किडा चिरडला जातो. त्यावरून आपण असें अनुमान काढतों की, जे जे दगड पडतात ते ते सगळे किड्यांना चिरडून टाकतात. एखादें दृश्य लगेच आपण अशा प्रकारें व्यापक दृष्टीने कां लागू करूं पाहतों ? कोणी म्हणतात की, अनुभवामुळे आपण असें करतों. परंतु, अमुक एक घटना प्रथमतःच घडली आहे असें आपण समजूं या. एखाद्या लहान मुलाला हवेंत उंच फेका, तें लगेच रडूं लागतें. आपल्या पूर्वजन्मींच्या अनुभवामुळे तें मूल रडूं लागतें काय ? पण त्याने हा अनुभव भविष्यकाळाला कां लागू केला ? कारण

विशिष्ट गोष्टींमधे आपल्याला खराखुरा संबंध अथवा 'व्यापकत्व' हा गुणधर्म दिसून येतो. फक्त विचारांत घेतलेल्या उदाहरणाला हा गुणधर्म तंतोतंत लागू पडतो की नाही हें पाहणे हेंच आपलें काम असतें— अतिव्याप्तिहि व्हायला नको आणि अव्याप्तिहि व्हायला नको. ह्या तारतम्यावरच सगळें मानवी ज्ञान अवलंबून आहे.

अनुमानांतील सदोषतेविषयी पुढील गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी. अनुभवाचें साधन, अनुभवाची पद्धति आणि त्या अनुभवाची पुनरावृत्ति हीं सारीं विशुद्ध असलीं तरच प्रत्यक्ष अनुभव हा प्रमाण मानतां येतो. इंद्रियांतील विकृतीमुळे किंवा भावविवशतेमुळे निरीक्षणांत दोष उत्पन्न होतात. म्हणूनच प्रत्यक्ष अनुभव हा अनुमानाचाच एक प्रकार होय. म्हणून सगळें मानवी ज्ञान हें अनिश्चित असतें आणि तें चुकीचेंहि असूं शकतें. खरा साक्षी कुणाला म्हणावयाचें? तो सांगत असलेली गोष्ट ही त्याच्या प्रत्यक्ष अनुभवास

आलेली असली तरच त्याला खरा साक्षी म्हणावयाचें. ह्या न्यायाने वेद सत्य आहेत, कारण सुयोग्य वा अधिकारी व्यक्तींचा पुरावा त्यांत समाविष्ट आहे. परंतु ही अनुभवशक्ति हें एखाद्याचेंच खास वैशिष्टय असतें किंवा काय ? तसें मुळीच नाही ! ऋषि, आर्य व म्लेच्छ ह्या सर्वांच्या ठायीं ती शक्ति सारखीच विद्यमान असते.

शब्दप्रमाण हा प्रत्यक्ष अनुभवाचा एक विशिष्ट प्रकार असून उपमान आणि अर्थापत्ति हीं केवळ सदोष अनुमानें होत असें बंगालमधील नव्य न्याय मानतो. म्हणून प्रत्यक्ष अनुभव आणि अनुमान हीं दोनच प्रमाणें उरतात.

असे कांही लोक आहेत की जे बाह्य आविष्काराला आधीचें स्थान देतात, तर दुसरे असे कांही लोक आहेत की जे आंतील विचाराला आधीचें स्थान देतात. पक्षी आधी की अंडें आधी ? भांड्याला तेलाचा आधार आहे की तेलाला भांड्याचा आधार आहे ?

हा प्रश्न असा आहे की त्याला कांही उत्तरच नाही. तो सोडून द्या ! मायेपासून सुटका करून घ्या !

१२५. जर सबंध जगच नष्ट होणार असेल तर मी चिंता कशाला करूं ? तुम्हांला ठाऊकच आहे की माझ्या तत्त्वज्ञानानुसार ती एक अतिशय उत्तम घटना ठरेल ! पण खरें म्हणजे जें जें माझ्या विरुद्ध आहे तें तें शेवटीं मला अनुकूल असेंच होईल, मी जगन्मातेचा लढणारा शिपाई नाही काय ?

१२६. एका महान् व्यक्तीच्या दुर्दम्य उत्साहानें माझें जीवन परिचालित झालें आहे हें खरें; पण त्याचें काय होय ? एकाच व्यक्तीच्या द्वारें सबंध जगाला प्रेरणा लाभत नसते.

श्रीरामकृष्णांना दिव्य स्फूर्ति प्राप्त झाली होती यावर माझा विश्वास आहे हें खरें, पण मला स्वत:लाहि दिव्य स्फूर्ति प्राप्त झाली आहे आणि तुम्हांलाहि ती लाभलेली आहे. तुमच्या शिष्यांना, तुमच्या शिष्यांच्या शिष्यांना आणि अशा प्रकारें

कल्पान्तापर्यंत होणाऱ्या सगळ्याच शिष्यांना ही दिव्य स्फूर्ति लाभणार आहे !

सत्याचा अर्थ गुप्त राखण्याचें युग संपुष्टांत आलें आहे हें तुम्हांला दिसत नाही काय ? चांगल्यासाठी म्हणा किंवा वाइटासाठी म्हणा हें युग आता संपलें आहे, तें आतां पुनः परतावयाचें नाही. ह्यापुढील काळांत सत्य हें साऱ्या जगाला खुलें राहील !

१२७. अवघ्या जगाला आपल्याला उपनिषदांच्या उंचीवर नेतां येईल असें मानण्यांत बुद्धदेवांची खरो-खरीच मोठी चूक झाली. आणि स्वार्थानें सगळ्याचीच नासाडी केली. श्रीकृष्ण हे अधिक शहाणे होते, कारण ते अधिक चतुर होते. परंतु तडजोड करणें बुद्धदेवांना पसंत नव्हतें. पूर्वीच्या युगांत तडजोडीच्या वृत्तीमुळे अवताराचा नाश झाला हें जगाने पाहिलें, तसेंच अवताराची ओळख न पटल्यामुळे अवतारी पुरुषाचे हालहाल करून त्याला ठार केल्याचेंहि जगाने पाहिलें; बुद्धदेवांनी एक क्षणभर जरी तडजोडीची वृत्ति

दाखविली असती तरी उभ्या आशिया खंडांत त्यांच्या जीवनकालांतच ईश्वर समजून लोकांनी त्यांची पूजाअर्चा सुरू केली असती. परंतु, त्यांचें नेहमी हेंच उत्तर असें की 'बुद्धत्व ही एक ज्ञानाची अवस्था आहे, ती व्यक्ति नव्हे !' खरोखरच बुद्धदेवांसारखा, नेहमी समजूतदारपणानें वागणारा समजूतदार मनुष्य कधीच जन्माला आला नाही !

१२८. पाश्चिमात्य देशांतील लोकांनी स्वामीजीं-पाशी असें म्हटलें होतें की, बुद्धदेवांना जर सुळावर चढविण्यांत आलें असतें तर त्यांचा मोठेपणा मनावर अधिक ठसला असता ! ह्या मताचें स्वामीजींनी 'रोमन लोकांसारखें पशुत्व' असें वर्णन केलें व ते पुढे म्हणाले, "कृतीची आवड ही अगदी निकृष्ट प्रकारची व पशूला शोभेल अशी आवड होय. म्हणूनच जगाला नेहमी महाकाव्य आवडेल. पण 'खालच्या खोल दरींत सरळ भिरकावून दिलें' असें वर्णन करणारा मिल्टन भारताच्या सुदैवाने भारतांत

जन्माला आला नाही. ब्राउनिंग कवीच्या एखाद-दोन ओळी मिल्टनच्या साऱ्या काव्याहून वरचढ ठरतील!" कथेंतील महाकाव्योचित कर्मशक्तीमुळेच रोमन लोक त्या कथेकडे आकृष्ट झाले होते असें त्यांचें मत होतें. येशू ख्रिस्तांना क्रुसावर ठार मारण्याच्या घटनेमुळेच ख्रिस्ती धर्माचा रोमन लोकांवर परिणाम होऊन त्यांच्या देशांत त्या धर्माचा प्रसार झाला. ते पुनः उद्‌गारले, "हो, हो, तुम्हां पाश्चिमात्यांना कृति हवी आहे! जीवनांतील लहानसहान घटनांतील काव्य तुम्हांला पाहतांच येत नाही! एक तरुण आई आपल्या मृत पुत्राला घेऊन बुद्धदेवांकडे येते ह्या गोष्टींत जें सौंदर्य आहे त्याहून अधिक सौंदर्य कुठे आढळेल? किंवा त्या बकऱ्यासंबंधीच्या घटनेंतील सौंदर्य कुठे आढळेल? तुम्हांला असें दिसून येईल की बुद्धदेवांचा महान् त्याग भारतांत कांही नवीन नव्हता!...पण निर्वाणोत्तर काळांतील काव्य पाहा!

"पावसाळी रात्र आहे. बुद्धदेव गुराख्याच्या

झोपडीजवळ येतात. पागोळ्या गळत असतात. ते भिंतीपाशी येतात. पाऊस कोसळत असतो व वाराहि वाहत असतो.

“आंतमधे असलेल्या गुराख्याला एका व्यक्तीचा चेहरा खिडकींतून दिसतो आणि तो विचार करूं लागतो, ‘हाः ! हा ! पिवळें वस्त्र धारण केलेल्या माणसा ! तेथेच उभा राहा ! तुला तेंच योग्य आहे !’ आणि नंतर तो गाऊं लागतो—

“ ‘माझीं गुरें घरांत सुरक्षित आहेत. अग्नि प्रखरपणें जळत आहे. माझी पत्नी सुरक्षित आहे आणि माझीं लेकरें सुखाने झोपी गेलीं आहेत ! म्हणून ढगांनो, पाहिजे तर रात्रभर वर्षाव करा !’

“आणि बुद्धदेव ह्यावर बाहेरून उत्तर देतात, ‘माझें मन माझ्या ताब्यांत आहे; मीं इंद्रियनिग्रह केला आहे. माझें हृदय दृढ आहे. म्हणून ढगांनो, पाहिजे तर सारी रात्र वर्षाव करीत राहा !’

“पुनः गुराखी म्हणतो, ‘शेतांतील पीक काढलें

आहे व गवत कोठारांत भरून टाकलें आहे. ओढ्यांत पाणी भरपूर आहे आणि रस्ते पक्के आहेत. म्हणून मेघांनो, रात्रभर पाहिजे तर वर्षाव करीत राहा !'

"आणि हें संभाषण असेंच चालू राहते. सरतेशेवटीं गुराख्याला आश्चर्य वाटतें व त्याला पश्चात्ताप होतो. तो उठतो आणि बुद्धदेवांचा शिष्य बनतो.

"किंवा न्हाव्याच्या गोष्टीहून अधिक सुंदर काय असेल ?

"भगवान बुद्ध माझ्या--न्हाव्याच्या घरावरून गेले !

"मी धावलों, त्यांनी मागे वळून पाहिलें व माझी--न्हाव्याची—वाट पाहिली !

"मीं म्हटलें, 'भगवन् ! मी आपणांशीं बोलूं काय ?'

"आणि ते मला--न्हाव्याला--म्हणाले, 'हो,! हो !'

"मीं म्हटलें--'निर्वाण हें माझ्यासारख्यांसाठी आहे काय ?'

"ते उत्तरले, 'होय! तुझ्यासारख्या न्हाव्यांसाठीहि निर्वाण आहे!'

"मीं म्हटलें, 'मी आपल्यामागून येऊं काय ?'

"ते म्हणाले, 'हो, ये!' माझ्यासारख्या न्हाव्यालाहि त्यांनी परवानगी दिली !

"मीं म्हटलें, 'भगवन्, मी आपल्या सन्निध राहूं काय ?'

"त्यांनी उत्तर दिलें, 'हो, तूं राहूं शकतोस!' माझ्यासारख्या दीनदरिद्री न्हाव्यालाहि त्यांनी अनुज्ञा दिली!"

१२९. बौद्धधर्म व हिंदुधर्म यांतील भेदाचा मुख्य मुद्दा असा : बौद्धधर्म म्हणतो, "हें सारें खोटें आभासमय आहे असें जाणा", तर हिंदुधर्म म्हणतो, "आभासांत ती सत्यवस्तु आहे हें जाणा." हें कसें काय अनुभवावयाचें ह्यासंबंधी हिंदुधर्माने सर्वांसाठी केवळ एकच एक नियम कधीहि सांगितला नाही. संन्यासमार्ग पत्करूनच बौद्धधर्माच्या आज्ञा पाळतां येतात;

हिंदुधर्माच्या आज्ञा जीवनाच्या कोणत्याहि अवस्थेंत पाळतां येतात. एकाच अंतिम सत्याकडे नेणारे हे सगळे मार्ग आहेत. धर्मासंबंधीचे अत्यंत उदात्त व श्रेष्ठ असें विवरण एका खाटकाच्या तोंडीं घालण्यांत आलें आहे. एका विवाहित स्त्रीच्या आदेशानुसार त्याने एका संन्याशाला उपदेश केला आहे. अशाप्रकारें बौद्धधर्म हा संन्यासीवर्गाचा धर्म बनला, परंतु हिंदुधर्माने संन्यासाश्रमाची खूप प्रशस्ति केलेली असली तरी 'दैनंदिन कर्तव्यें--मग तीं कोणतींहि असोत-- श्रद्धायुक्त अंतःकरणाने करावींत व हाच ईश्वरप्राप्तीचा मार्ग होय' असें हिंदुधर्म आजहि शिकवीत आहे.

१३०. स्त्रियांच्या संन्यासाविषयक ध्येयाचें विवरण करतांना स्वामीजी म्हणाले—"तुमच्या संघासाठी तुम्हीच नियम तयार करा व तुमचीं ध्येयेंहि ठरवा. आणि त्यांत सार्वजनीन ध्येयासाठीहि थोडी जागा ठेवा! परंतु, लक्षांत असूं द्या की सार्वजनीन आदर्शा-

"ते उत्तरले, 'होय! तुझ्यासारख्या न्हाव्यांसाठीहि निर्वाण आहे !'

"मीं म्हटलें, 'मी आपल्यामागून येऊं काय ?'

"ते म्हणाले, 'हो, ये !' माझ्यासारख्या न्हाव्यालाहि त्यांनी परवानगी दिली !

"मीं म्हटलें, 'भगवन्, मी आपल्या सन्निध राहूं काय ?'

"त्यांनी उत्तर दिलें, 'हो, तूं राहूं शकतोस !' माझ्यासारख्या दीनदरिद्री न्हाव्यालाहि त्यांनी अनुज्ञा दिली !"

१२९. बौद्धधर्म व हिंदुधर्म यांतील भेदाचा मुख्य मुद्दा असा : बौद्धधर्म म्हणतो, "हें सारें खोटें आभासमय आहे असें जाणा", तर हिंदुधर्म म्हणतो, "आभासांत ती सत्यवस्तु आहे हें जाणा." हें कसें काय अनुभवावयाचें ह्यासंबंधी हिंदुधर्माने सर्वांसाठी केवळ एकच एक नियम कधीहि सांगितला नाही. संन्यासमार्ग पत्करूनच बौद्धधर्माच्या आज्ञा पाळतां येतात;

हिंदुधर्माच्या आज्ञा जीवनाच्या कोणत्याहि अवस्थेंत पाळतां येतात. एकाच अंतिम सत्याकडे नेणारे हे सगळे मार्ग आहेत. धर्मासंबंधीचे अत्यंत उदात्त व श्रेष्ठ असें विवरण एका खाटकाच्या तोंडीं घालण्यांत आलें आहे. एका विवाहित स्त्रीच्या आदेशानुसार त्याने एका संन्याशाला उपदेश केला आहे. अशाप्रकारें बौद्धधर्म हा संन्यासीवर्गाचा धर्म बनला, परंतु हिंदु-धर्माने संन्यासाश्रमाची खूप प्रशस्ति केलेली असली तरी 'दैनंदिन कर्तव्यें--मग तीं कोणतींहि असोत--श्रद्धायुक्त अंतःकरणाने करावींत व हाच ईश्वर-प्राप्तीचा मार्ग होय' असें हिंदुधर्म आजहि शिकवीत आहे.

१३०. स्त्रियांच्या संन्यासाविषयक ध्येयाचें विवरण करतांना स्वामीजी म्हणाले—"तुमच्या संघासाठी तुम्हीच नियम तयार करा व तुमचीं ध्येयेंहि ठरवा. आणि त्यांत सार्वजनीन ध्येयासाठीहि थोडी जागा ठेवा! परंतु, लक्षांत असूं द्या की सार्वजनीन आदर्शा-

साठी सबंध जगांत अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकीं माणसेंहि कधीच तयार नसतात ! संप्रदायांना वाव हवा, परंतु संप्रदायातीत होण्यासाठीहि वाव हवा. तुमची साधनसामग्री तुम्हांलाच बनवावी लागेल. नियम जरूर तयार करा; पण ते असे तयार करा की, आपल्याला नियमांची जरूरी नाही असें जेव्हां लोकांना वाटूं लागेल, नियमांच्या आधाराशिवाय चालण्याची जेव्हा लोकांची तयारी होईल तेव्हा लोकांना या नियमांतून मुक्त होतां आलें पाहिजे. पूर्णपणें शासनाच्या अधीन राहण्याचा पूर्ण स्वातंत्र्याशीं मेळ घालण्यांतच आपली मौलिकता आहे. संन्यासाश्रमांतहि असें करतां येऊं शकतें."

१३१. दोन वेगवेगळे मानववंश एकत्र येऊन एकमेकांत मिसळतात, एकजीव होतात व त्या दोहोंतून एक वेगळा बलसंपन्न असा मानववंश उदयास येतो. हा नवीन मानववंश स्वतःला संमिश्रणापासून अलिप्त राखण्याचा प्रयत्न करतो व अशाप्रकारें

जातिसंस्थेला सुरुवात होते. सफरचंदाचें उदाहरण घ्या. सफरचंदाच्या एका जातीचें दुसऱ्या जातीवर कलम करून सफरचंदाची उत्तम जात तयार करण्यांत येते. परंतु एकदा अशी जात निर्माण झाली की आपण ती पूर्णपणें सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतों.

१३२. भारतांतील मुलींच्या शिक्षणाविषयी बोलतांना स्वामीजी म्हणाले, "देवपूजेंत तुम्ही मूर्ति अवश्य वापरल्या पाहिजेत हें खरें; पण तुम्हांला त्यांत परिवर्तन करतां येऊं शकतें. कालीमातेची एकाच प्रकारची मूर्ति तुम्हीं पूजिली पाहिजे असें नाही. कालीचीं निरनिराळ्या प्रकारचीं चित्रें काढण्यासाठी आपल्या मुलींना प्रोत्साहन द्या. सरस्वतीसंबंधी वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक कल्पना करा. आपापल्या कल्पनेनुसार मुलींना चित्रें काढूं द्या, चित्रें रंगवूं द्या, आणि मूर्ति घडवूं द्या.

"देवघरांतील वेदीच्या अगदी खालच्या पायरीवर ठेवलेला कुंभ नेहमी पाण्याने भरलेला असला पाहिजे.

आणि तामिळ पद्धतीचीं मोठीं निरांजनें नेहमी तेवत असलीं पाहिजेत. ह्यांत भर म्हणून नित्य भजन-कीर्तनाची व्यवस्था करतां आली तर तें हिंदुधर्मीयांच्या भावनांशीं कमालीचें जुळेल.

"परंतु जे विधि आचारांत आणावयाचे ते मात्र वैदिकच असावयास हवेत. वेदांत सांगितल्याप्रमाणे उपासनेच्या प्रसंगीं वैदिक अग्नि प्रज्वलित करण्यासाठी वेदिका हवी, आणि आहुति देण्याच्या वेळीं मुलीमुलें हजर असावयास हवींत. हा धर्मविधि असा आहे की जो सगळ्या भारतांत आदरास पात्र होऊ शकेल.

"तुम्ही आपल्या भोवती तऱ्हेतऱ्हेचे प्राणी गोळा करा. गाईपासूनच प्रारंभ करणें चांगलें होईल. अर्थात्, तुम्ही कुत्रीं, मांजरें, पक्षी आणि इतरहि प्राणी गोळा करा. ह्या प्राण्यांना खाऊं घालण्यासाठी त्यांची काळजी घेण्यासाठी मुलामुलींना वेळ मिळूं द्या.

"नंतर येतो ज्ञानयज्ञ. तोच सर्वांत सुंदर होय.

भारतांत सगळे ग्रंथ पवित्र मानले जातात. केवळ वेदच नव्हे, तर इंग्रजांचे व मुसलमानांचे ग्रंथहि पवित्र मानले जातात.

"जुन्या कलांचें पुनरुज्जीवन करा. खव्यापासून फळांचे नमुने बनविण्यास मुलींना शिकवा. कलात्मक पाकशास्त्र व शिवणकाम त्यांना शिकवा. चित्रकला, फोटोग्राफी, कागदाचें नक्षीदार काम करणें, जरकाम करणें, कशीदा काढणें हें सारें त्यांना शिकूं द्या. जरूर पडल्यास कमावलेल्या विद्येच्या साहाय्याने प्रत्येकीला आपला चरितार्थ चालवितां आला पाहिजे इकडे लक्ष असूं द्या.

"आणि मानवतेचा कधीच विसर पडूं देऊं नका! मानवतावादी मानवपूजेची कल्पना भारतामधे बीजरूपांत अस्तित्वांत आहे; परंतु तिचा वैशिष्टयपूर्ण असा पुरेसा विकास कधीच झाला नाही. तुमच्या विद्यार्थिनींना तिचा विकास करूं द्या. तिला काव्याचें, कलेचें रूप द्या. खरेंच, स्नानानंतर व भोजनापूर्वी

दररोज भिकाऱ्यांची पाद्यपूजा केल्याने हृदय आणि हात ह्या दोहोंना आश्चर्यकारक असें वळण लागेल. कधी कधी लहान मुलामुलींची—तुमच्या विद्यार्थिनीं-चीहि पूजा करावी. किंवा, तुम्हीं दुसऱ्यांचीं मुलें आणावींत, त्यांचें पालनपोषण करावें, त्यांना खाऊं घालावें. मला माताजी* एकदा काय म्हणाल्या होत्या ?--'स्वामीजी ! मी असहाय आहें. पण मी ह्या चिमण्या जीवांची पूजा करतें व ते मला मुक्ति देतील !' मुलींच्या रूपांत आपण जणु उमेचीच सेवा करीत आहोंत अशी त्यांची भावना आहे. आणि असा विचार मनांत बाळगून पाठशाळेला प्रारंभ करणें ह्याहून अधिक चांगलें तें काय आहे?"

१३३. प्रेम हें नेहमीच आनंदाचें व्यक्त रूप असतें. त्यावर दु:खाची किंचित्शी जरी छाया पडली तरी ती देहबोधाची आणि स्वार्थाची द्योतक असते असें मानावें.

---

* तपस्विनी माताजी, म्हणजेच कलकत्त्याच्या महाकाली पाठशाळेच्या संस्थापिका.

१३४. कायद्याच्या बंधनांपलीकडे जें कांही आहे त्या साऱ्याचा विवाहांत समावेश होतो असें पाश्चिमात्य मानतात, तर भारतांतील लोकांची विवाहविषयक कल्पना अशी आहे की, दोन व्यक्तींनी कायमचें एकत्र राहावें यासाठी समाजाने त्यांच्यावर घातलेलें बंधन म्हणजे विवाह होय. पतिपत्नींची इच्छा असो वा नसो, परंतु त्या दोघांनी जन्मोजन्मीं एकमेकांशीं विवाहबद्ध व्हावयास हवें. प्रत्येकाला दुसऱ्याच्या पुण्याचा अर्धा वांटा मिळतो. आणि दोघांपैकी एखादा खूपच मागे पडला तर त्याची अगर तिची प्रगति होऊन तो अगर ती दुसऱ्याच्या बरोबरीने वाटचाल करूं लागेपर्यंत दुसऱ्याने नुसतें थांबावयाचें व वाट पाहावयाची.

१३५. जाणिवेच्या खालची अवस्था व जाणिवेच्या पलीकडची अवस्था हे जणुकांही दोन महासागर आहेत. सामान्य जाणीव म्हणजे जणुकांही या दोन महासागरांमधील पातळ पडदा होय.

१३६. पाश्चिमात्य लोकांना जेव्हा जाणिवेबद्दल इतकें बोलतांना मीं ऐकलें तेव्हा माझा माझ्या कानांवर विश्वास बसेना! जाणीव? या सामान्य जाणिवेचें काय महत्त्व? कारण, जाणिवेच्या खाली जी अवस्था आहे तिच्या अथांग गंभीरतेपुढे आणि जाणिवेच्या पलीकडे असलेल्या अवस्थेच्या उत्तुंगतेपुढे ही सामान्य जाणीव म्हणजे कांहीच नव्हे! या बाबतींत मी कधी भ्रमांत पडणार नाहीं. कारण, समोर बसलेल्या व्यक्तीच्या नेणीवयुक्त मनाच्या आधारें श्रीरामकृष्ण बोलतां बोलतां दहा मिनिटांत तिचें सारें पूर्वचरित्र जाणून घेत व त्याच्या आधारें त्या व्यक्तीचा भावी काल व तिच्या शक्ति यांचें त्यांना निश्चित ज्ञान होत असे हें मीं प्रत्यक्ष पाहिलेलें आहे!

१३७. या साऱ्या दर्शनादि गोष्टी गौण होत. हा कांही खरा योग नव्हे. आपल्या विधानांची सत्यता अप्रत्यक्षपणें प्रस्थापित करण्यासाठी या गोष्टी कांहीशा उपयुक्त ठरूं शकतात. स्थूल जडद्रव्याच्या पलीकडे

निश्चितपणें कांहीतरी आहे असा या दर्शनादि गोष्टींच्या थोड्याशा अनुभवाने देखील विश्वास वाटूं लागतो. तथापि, जे आपला सारा काळ ह्या गोष्टींतच खर्च करतात ते भयंकर धोक्यांत सापडतात.

ह्या दर्शनादि गोष्टी म्हणजे खऱ्या ज्ञानाच्या सीमेवरील गोष्टी होत ! त्यांच्या द्वारें प्राप्त झालेल्या ज्ञानाला कधीच निश्चितता वा स्थिरता असूं शकत नाही. त्या सीमेवरील गोष्टी आहेत असें मीं म्हटलें नाही काय ? सीमारेषा ही कधीच स्थिर नसते !

१३८. मी बुद्धदेवांच्या दासांचा दास आहें. ज्याने कधीहि कोणतेंहि कृत्य स्वत:साठी केलें नाही, ज्याचें हृदय इतकें विशाल होतें की तें अवघ्या जगाला आपल्या ठायीं सामावून घेत असे असा त्यांच्यासारखा दुसरा पुरुष कधीतरी झाला काय ? ते इतके दयाळू होते की स्वत: राजपुत्र आणि संन्यासी असूनहि एका य:कश्चित् बकऱ्याचे प्राण वांचविण्यासाठी ते स्वत: प्राणार्पण करण्यास उद्युक्त झाले. त्यांचें हृदय

प्रेमानें इतकें भरलें होतें की त्यांनी भुकेल्या वाघिणीच्या तोंडीं आपली मांडी देऊन तिची भूक शमविली. ते इतके प्रेमळ होते की एका चांडालाचें आतिथ्य ग्रहण करून त्यांनी त्याच्यावर कृपा केली. मी लहान असतांना त्यांनी माझ्या खोलींत येऊन मला दर्शन दिलें. ते स्वयं भगवान आहेत हें मीं ओळखलें आणि त्यांच्या चरणांवर लोटांगण घातलें!

१३९. शुकदेव हे आदर्श परमहंस होते. मनुष्यांपैकी फक्त तेच अखंड सच्चिदानंदरूप महासागराचें ओंजळभर पाणी पिऊं शकले होते. बहुतांश संतांनी आपल्या संपूर्ण जीवनांत ह्या महासागराच्या किनाऱ्यावर आपटणाऱ्या लाटांची केवळ गर्जनाच ऐकलेली असते. फारच थोड्या संतांना या महासागराचें दर्शन घडलेलें असतें आणि त्याहूनहि थोड्या संतांनी या महासागराचें पाणी चाखलेलें असतें. पण शुकदेवांनी मात्र या आनंदसागराचें जल प्राशन केलें होतें.

१४०. ज्या भक्तींत त्यागाची भावना नाही ती

कसली भक्ति ? ती अत्यंत घातक आहे.

१४१. आपण सुख वा दुःख ह्यांपैकी कशाचीच उपासना करीत नाहीं. जें ह्या दोहोंच्या पलीकडे आहे त्याच्याप्रत पोहोचण्यासाठी आपण ह्या दोहोंच्या साहाय्याने प्रयत्न करीत असतों.

१४२. शंकराचार्यांना वेदांची--राष्ट्रीय संगीताची --लय उमगलेली होती. मला असें नेहमी वाटतें की, ते जेव्हा तरुण होते तेव्हा त्यांनाहि माझ्यासारखेंच दिव्य दर्शन झालें असावें व त्याच्या साहाय्यानेच त्यांनी तें प्राचीन संगीत शोधून काढलें. तें कसेंहि असो, त्यांच्या समग्र जीवनकार्यांत आपल्याला वेदोपनिषदांच्या सुंदर संगीताचा झंकारच ऐकावयास मिळतो.

१४३. आईचें प्रेम कांही बाबतींत श्रेष्ठ आहे हें खरें, तथापि समस्त जगांत स्त्रीपुरुषामधील प्रेम हें जीवाचा ईश्वराशीं असलेला संबंध दर्शविण्यासाठी प्रतीक म्हणून मानलें जातें. दुसऱ्या कोणत्याहि प्रेम-

प्रकारांत आदर्शीकरणाची इतकी प्रचंड शक्ति नाही. या प्रेमांत प्रियकराला कल्पनागत रूप प्रत्यक्ष प्राप्त होतें. हें प्रेम आपल्या विषयाचें रूपान्तर घडवून आणतें.

१४८. जनक होणें इतकें सोपें आहे काय? सिंहासनावर बसूनहि संपूर्णपणें अनासक्त राहणें, संपत्ति, कीर्ति, पत्नी, मुलें ह्यांपैकी कशाबद्दलहि ममत्व न बाळगणें हे सोपें का आहे? पाश्चिमात्य देशांत मला कित्येकांनी सांगितलें की, 'आम्हांला ही स्थिति प्राप्त झालेली आहे.' मी त्यावर फक्त इतकेंच म्हणत असे, 'अशीं मोठीं माणसें भारतांत जन्मत नाहीत!'

१४५. गृहस्थ व संन्यासी ह्यांच्यामधील फरक हा काजवा आणि तळपणारा सूर्य, छोटेसें तळें आणि अथांग महासागर, राईचा कण आणि मेरु पर्वत ह्यांच्यामधील फरकासारखा आहे हें स्वतःला सांगण्यास कधी विसरूं नका आणि आपल्या मुलांनाहि तें शिकविण्यास कधी विसरूं नका.

या जगांतील सर्व वस्तु भयव्याप्त आहेत, केवळ त्यागच भयरहित आहे.

ढोंगी साधु आणि आपलें व्रत आचरण्यांत जे असफल झाले आहेत असे साधुहि धन्य होत. कारण त्यांनाहि आपलें ध्येय चांगलें माहीत असतें. आणि म्हणून ते इतरांच्या यशाला अंशतः कारणीभूत होतात!

आपल्याला आपल्या ध्येयाचें विस्मरण कधीहि होतां कामा नये.

१४६. ज्या नदींतील पाणी वाहत असतें ती नदी पवित्र होय; जो साधु नेहमी भ्रमण करीत असतो तो पवित्र होय.

१४७. सोनें आपल्याला मिळावें ह्या इच्छेने जो संन्यासी सोन्याचा विचार करतो त्याने आपली आत्महत्याच केली आहे असें समजावें.

१४८. महंमद हा भला पुरुष होता अथवा बुद्ध हा भला मनुष्य होता ह्याचें मला काय होय? माझें

भलेंपण वा बुरेंपण ह्यांत त्यामुळे कांही फरक पडतो काय? आपण स्वत:साठी स्वत:च्याच प्रयत्नाने चांगले बनूं या.

१४९. ह्या देशांतील तुम्हां लोकांना, आपण आपलें व्यक्तित्व गमावून बसूं अशी किती धास्ती वाटत असते! असें कां बरें? तुम्हांला अजून व्यक्तित्वच प्राप्त झालेलें नाही. जेव्हा तुम्हांला तुमच्या संपूर्ण स्वरूपाचें ज्ञान होईल तेव्हाच तुम्हांला खरें व्यक्तित्व लाभेल, तोंवर नाही. ह्या देशांत आणखी एक गोष्ट मी सतत ऐकत आहें. ती ही की, आपलें जीवन हें नेहमी प्रकृतीशीं जुळतें असें असलें पाहिजे. ह्या जगांत आजवर जेवढी म्हणून प्रगति झालेली आहे तेवढी सारी प्रकृतीवर मात केल्यानेच झालेली आहे, हें तुम्हांला ठाऊक नाही काय? जर आपल्याला थोडीहि प्रगति साधावयाची असेल तर पावलोपावलीं आपल्याला प्रकृतीशीं झगडायला हवें.

१५०. भारतांत लोक मला असें सांगतात की,

सर्वसाधारण लोकांना मीं अद्वैत वेदान्त शिकवूं नये; पण मी म्हणतों कीं, मी तो एखाद्या लहान मुलालाहि समजावून देऊं शकेन. अत्युच्च आध्यात्मिक सत्यांच्या अध्यापनास तुम्ही कितीहि लवकर सुरुवात केली तरी तें चांगलेंच आहे.

१५१. तुम्ही जितकें कमी वाचाल तितकें चांगलें. गीता व वेदान्तावरील इतर चांगले ग्रंथ वाचा. तेवढेंच तुम्हांला पुरेसें आहे. प्रचलित शिक्षणपद्धति पूर्णपणें सदोष आहे. विचार कसा करावा हें मनाला कळायला लागण्यापूर्वीच त्यांत अनेक गोष्टी ठासून भरल्या जातात. सुरुवातीला मनोनिग्रहाचें शिक्षण दिलें पाहिजे. मला माझ्या शिक्षणाला जर आता पुन: सुरुवात करावयाची असती आणि त्या बाबतींत बोलण्याची मला कांही मुभा असती तर मनावर ताबा कसा मिळवावा हें मी प्रथम शिकलों असतों आणि नंतरच वाटल्यास इतर माहिती मीं गोळा केली असती. निरनिराळ्या गोष्टी शिकण्यास लोकांना फार


वेळ लागतो याचें कारण असें की स्वेच्छेनुसार त्यांना मन एकाग्र करतां येत नाही.

१५२. जरी वाईट दिवस आले तरी त्यांत काय आहे ? लंबक मागे परतून दुसऱ्या बाजूस जाईलच. पण तेंहि चांगलें नव्हे. खरें म्हणजे तो थांबविणें हेंच आपलें कार्य आहे.

स्वामी विवेकानंद शतवार्षिक जयंती स्मारक ग्रंथ

# स्वामी विवेकानंद ग्रंथावली

१० खंड : एकूण पृष्ठसंख्या सुमारें ६०००



स्वामी विवेकानंदांच्या आजपर्यंत उपलब्ध झालेल्या समस्त
प्रकाशित आणि अप्रकाशित इंग्रजी व बंगाली साहित्याचा
प्रथमच प्रसिद्ध झालेला अधिकृत मराठी अनुवाद

डबल डेमी १/१६ आकार; आकर्षक जॅकेट व चित्रें यांसह

किंमत—

**कापडी बांधणी प्रत्येक खंडास ९ रु. संपूर्ण संच ९० रु.**
**बोर्ड बांधणी प्रत्येक खंडास ७ रु. संपूर्ण संच ७० रु.**

**श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर – १.**

# आमचें अन्य प्रकाशन

| | |
|---|---|
| १. श्रीरामकृष्ण-चरित्र-- | रु.न.पै. |
| न. रा. परांजपे कृत--प्रथम भाग | |
| (चवथी आवृत्ति) | ४.२५ |
| २. ,, ,,--द्वितीय भाग | |
| (तिसरी आवृत्ति) | ४.३७ |
| ३. श्रीरामकृष्ण-वचनामृत--श्री. 'म' कृत | |
| (दुसरी आवृत्ति) | ५.५० |
| ४. स्वामी विवेकानंद यांचें चरित्र-- | |
| सुधारलेली दुसरी आवृत्ति | ७.२५ |
| ५. साधु नागमहाशय-चरित्र--(दुसरी आवृत्ति) | २.०० |
| ६. हिमालयाच्या कुशींत--स्वामी अखंडानंद | २.५० |
| ७. श्रीरामकृष्ण-वाक्सुधा--(पांचवी आवृत्ति) | |
| स्वामी ब्रह्मानंद द्वारा संकलित | १.०० |
| ८. स्वामी विवेकानंदांच्या आठवणी-- | |
| (दुसरी आवृत्ति) | १.७५ |

## स्वामी विवेकानंदकृत योगावरील पुस्तकें

| | |
|---|---|
| ९. ज्ञानयोग | ४.०० |
| १०. राजयोग (पतंजलींच्या योगसूत्रविवरणांसह) | ३.०० |
| ११. कर्मयोग--(तिसरी आवृत्ति) | २.१० |

| | | |
|---|---|---|
| | | रु.न.पै. |
| १२. | भक्तियोग--(दुसरी आवृत्ति) | १.७५ |
| १३. | प्रेमयोग | १ ७५ |

## स्वामी विवेकानंदकृत विविध विषयांवरील लोकप्रिय पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १४. | कोलंबो ते अल्मोरा (भारतांत दिलेलीं व्याख्यानें) | ६.२५ |
| १५. | स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत--(संकलक श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती) | ४.५० |
| १६. | स्वामी विवेकानंदांचीं पत्रें | ४.७५ |
| १७. | दैवी वाणी ( Inspired Talks ) | २.७५ |
| १८. | बुद्धदेवांचा जगाला संदेश आणि इतर व्याख्यानें | २.२५ |
| १९. | आत्मसाक्षात्कार : साधना व सिद्धि | २.२५ |
| २०. | युरोपच्या प्रवासाची दैनंदिनी | २.२० |
| २१. | धर्माचें विज्ञान आणि तत्त्वज्ञान | २.०० |
| २२. | स्वामी विवेकानंदांच्या मुलाखती व प्रश्नोत्तरें | २.०० |
| २३. | भारतीय नारी--(दुसरी आवृत्ति) | २.०० |
| २४. | वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव | १.७५ |
| २५. | महापुरुषांच्या जीवनकथा--(सातवी आवृत्ति) | १.६२ |
| २६. | स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें | १.६० |
| २७. | भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्गीता | १.६० |
| २८. | कविता | १.५० |

| | | |
|---|---|---|
| | | रु.न.पै. |
| २९. | वेदान्त आणि जीवन | १.२५ |
| ३०. | पूर्व आणि पश्चिम | १.२५ |
| ३१. | सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना | १.०० |
| ३२. | माझे गुरुदेव––(चवथी आवृत्ति) | १.०० |
| ३३. | शिकागो व्याख्यानें––(चवथी आवृत्ति) | ०.९० |
| ३४. | आधुनिक भारत | ०.९० |
| ३५. | पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व | ०.६० |
| ३६. | सुबोध राजयोग | ०.६० |
| ३७. | हिंदुधर्माचें नव-जागरण––(दुसरी आवृत्ति) | ०.५६ |
| ३८. | शिक्षण––(दुसरी आवृत्ति) | ०:५६ |
| ३९. | पवहारी बाबा––(दुसरी आवृत्ति) | ०.५० |

## पॉकेटसाईज पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| ४०. | माझें जीवन आणि कार्य––स्वामी विवेकानंद | ०.६५ |
| ४१. | माझ्या मोहिमेची योजना––स्वामी विवेकानंद | ०.५० |
| ४२. | विवेकानंद-वाणी––(चवथी आवृत्ति) | ०.९० |
| ४३. | स्वामी विवेकानंद म्हणतात–– | ०.५० |
| ४४. | रामकृष्ण-संघ––ध्येय व इतिहास–– स्वामी तेजसानंद | ०.७५ |

**श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर – १.**